क्र.२/नसवि/महासभा/ ०४ /२०२०-२०२१
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ जानेवारी २०२१

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०४ /२०२०-२०२१

### महानगरपालिका सभेची नोटीस (ऑनलाईन ॲपद्वारे)

प्रति,
मा. ------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दि.२०/०१/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली येथे **मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१७/१२/२०२० ची तहकूब सभाग दि.२३/१२/२०२० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव. ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील मंगळवार बाझार येथील खोकी पुर्नवसनव्यापारी संकुलनाचे श्री.महालक्ष्मी व्यापारी संकुल असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील जुना रेल्वे स्टेशन येथील एस.एफ.सी.मेगा मॉलच्या पिछाडीस मनपा मार्फत १८४ गाळे बांधण्यात आलेल्या मार्केटला श्री.साई मार्केट असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील सिटी हायस्कूल रोडचे बृहत्रयीरत्न वैद्यराज दातारशात्री मार्ग असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ कुपवाड मधील रामकृष्ण नगर चौकातून शालिनीनगरकडे जाणाऱ्या १०० फुटी रस्त्यास साथी स्व.बिराज साळूंखे मार्ग असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली त्रिकोणी बाग येथून गल्ली नं.२ आतील बाजूस लालबाग गणेश मंदिर असून, नागरिकांना मंदिर पत्ता लगेच समजनेकरीता त्रिकोणी बाग कॉर्नर येथील चौकास लालबाग कॉर्नर असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.११/०१/२०२१ चे विषयपत्र.**

९. महापालिका मालकीच्या विजयनगरमधील सत्राळकर चौकातील स.नं.३०/२अ व ३०/२ब मधील क्षेत्र ५२३.०० चौ.मी.जागा भाडेतत्वावर ई-लिलाव पद्धतीने देणेसाठी ई-लिलावामध्ये उच्चत्तम बोली श्री.संदिप तुकाराम टेंगले यांची र.रु.८,२९,७४०/- इतकी असून, सदर लिलावातील इतर नमुद शर्ती-अटीस अधिन राहून श्री.टेंगले यांच्या नावाने भाडेपट्टाने देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र.**

१०. महापालिका हद्दीतील सि.स.नं.१०८६ मधील प्रतापसिंह उद्यान येथील ३० चौ.मी.इत्यादी आर.सी.सी.बांधकाम व त्या बांधकामाने व्यापलेली जागा भाडेतत्वावर ई-लिलाव पद्धतीने देणेसाठी उच्चत्तम बोली श्री.दादासाहेब जयवंत सरगर यांची र.रु.१,०३,००४/- इतकी असून, सदर लिलावातील इतर नमुद शर्ती-अटीस अधिन राहून श्री.सरगर यांच्या नावाने भाडेपट्टाने देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र.**

११. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील र.रु.२.९३ कोटी रक्कमेची कामे निश्चित करुन घेवून, सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.२२/१२/२०२० चे विषयपत्र.**

१२. भारत सरकार अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांच्या वतीने प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत महानगरपालिकेतील अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रातील विषयपत्रातील नमुद तीन कामांचा एकुण र.रु.११,५२,१६,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग,मुंबई यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेकामी **प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.११/०१/२०२१ चे विषयपत्र.**

१३. सर्वधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२० महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत मंजूर र.रु.१२.१८ कोटी रक्कमेतून शिल्लक राहिलेल्या रकमेतून तयार केलेला विषयपत्रातील नमुद तीन कामांचा र.रु.५६ लक्ष रक्कमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.१४/१२/२०२० चे विषयपत्र.**

१४. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेमधून सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील काळीखण व परिसर सुशोभिकरणाचा र.रु.१,२८,३३,९१४/- मात्रचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.३१/१२/२०२० चे विषयपत्र.**

१५. सांगली येथील श्रीकृष्णा नदी वरील आर्यविन पुल रामेश्वर मंदिर ते को.प.पर्यत प्रस्तावित पुर संरक्षक बांधकाम करणेसाठी महापालिकेच्या वतीने शासन निर्णयातील परिशिष्ठ २ च्या निर्णयान्वये समंत्तीपत्र देणे तसेच, प्रस्तावित कामासाठी मान्यता अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या दि.३०/०८/२०१९ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार सहभागीता रक्कम जलसंपदा विभागाकडे वर्ग करणे व सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा दोषदायीत्व कालावधीत संपल्यानंतर सदरचे काम महापालिकेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर पुढील देखभाल दुरुस्तीची जबाबदारी महापालिकेकडे येणार असल्याने याबाबत **धोरणात्मक निर्णय घेणेसाठी प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/१२/२०२० चे विषयपत्र.**

१६. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१७. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**(टिप - मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेंजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)**

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०४/२०२०-२०२१

## महापालिका सभा दिनांक २०/०१/२०२१ करीता.(ऑनलाईन अँपद्वारे)

बुधवार दि.२०/०१/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे ऑनलाईन अँपद्वारे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. **सौ.रईसा मुस्ताकअली रंगरेज यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१ मधील अहिल्यानगर बाजारपेठ येथे रस्त्यावर आठवडा बाजार भरत आहे.सदर बाजाराच्या ठिकाणी तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. त्यामुळे संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी बंद होतो. सद्यस्थितीत कोव्हिड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होत आहे. गर्दीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते, सदरचा भाजीपाला व्यवसाय व्यापाऱ्यांना त्यालागून असणाऱ्या शेडगे किराणा स्टोअर्स समोर ८० फुटी प्रशस्त रस्ता आहे. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मुबलक जागा आहे. त्यामुळे लोकांची गर्दी कमी होणार व वाहतुकीस अडथळा होणार नाही. नागरिकांची चांगली सोय होईल त्या भागातील नागरिकांची तेथे भाजीपाला विक्रीचा बाजार शेडगे किराणा स्टोअर्स समोर ८० फुटी रस्त्यावर करावा अशी वारंवार मागणी होत आहे. तरी सदर भाजीपाला बाजार अहिल्यानगर बाजारपेठ येथून तेथे जवळ असणाऱ्या शेंडगे किराण स्टोअर्स समोर ८० फुटी रस्त्यावर भरविणेकामी प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी विचारार्थ व निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

२. **श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये लाभार्थ्यांनी अनुदान योजनेतून वैयक्तीक शौचालय बांधलेली आहेत. यामध्ये पात्र लाभार्थ्यांनी शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. त्यामधील काही पात्र लाभार्थ्यांना बांधकाम पूर्ण करुन देखील शौचालयचे फोटो मा.शासनाच्या पोर्टलवर अपलोड न केल्याने महानगरपालिकेकडून शौचालयाचे अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही. याबाबत आम्ही वैयक्तीक स्वरुपात शौचालयाचे अनुदानाबाबत पाठपुरावा केलेला आहे. परंतु, संबंधीतांकडून मुदतीत कार्यवाही न केल्याने बरेचशे लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार आहेत. सबब, ज्या लाभार्थ्यांनी वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेले आहेत. त्यांना अनुदानाचा पहिला व दुसरा हप्ता देणेकामी आर्थिक तरतुद करावी. त्यासाठी महानगरपालिकेने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सदरची अनुदान योजना पुन:श्च कार्यान्वीत करणेसाठी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

३. **श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरा घरकुल मिरज दिंडीवेस,मालगाव वेस येथील वारस व वाढीव पात्र लाभार्थी तसेच, संजय गांधी नगर मिरज येथील वंचित व वाढीव पात्र लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्याकरीता महापालिकेचे एकात्मिक आवास योजनेंतर्गत एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुल मिळण्याकरीता अर्ज केलेले आहेत. तसेच, संबंधीत लाभार्थी यांनी घरकुलासाठी लागणारे आवश्यकती सर्व कागदपत्रे नगर अभियंता,शं.ना.द.नि.या कक्षाकडे सादर केलेली आहेत. त्यास अनुसरुन मालती सचिन बनसोडे, श्री.दादासाहेब हिंदूराव कांबळे, कस्तुरी आप्पासाहेब घटकांबळे,अनुराधा हणमंत कांबळे,सुमन पायाण्णा कोळी, सुभद्राबाई पांडूरंग कुरणे, श्रीकांत हिराप्पा कांबळे, श्री.अमोल विकास सुर्यागण सदर लाभार्थ्यांना एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यासाठी धोरणात्मक निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

४. **श्री.विवेक आप्पा कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरा घरकुल मिरज दिंडीवेस,मालगाव वेस येथील वारस व वाढीव पात्र लाभार्थी तसेच, संजय गांधी नगर मिरज येथील वंचित व वाढीव पात्र लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्याकरीता महापालिकेचे एकात्मिक आवास योजनेंतर्गत एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुल मिळण्याकरीता अर्ज केलेले आहेत. तसेच, संबंधीत लाभार्थी यांनी घरकुलासाठी लागणारे आवश्यकती सर्व कागदपत्रे नगर अभियंता, शं.ना.द.नि.या कक्षाकडे सादर केलेली आहेत. त्यास अनुसरुन संगिता मारुती संकपाळ,कांचन पांडूरंग देवकुळे या सदर लाभार्थ्यांना एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यासाठी धोरणात्मक निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

५. **श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.७ मधील उदगाव वेस मरगुबाई मंदिर जवळील शंकर सायकल लगत असलेली मुतारी पाडणे आवश्यक आहे. सदरची मुतारी ही अत्यंत जुनी झालेली असून, धोकादायक झालेली आहे. त्यामुळे त्याचा वापर होत नाही. तसेच, सदर ठिकाणी मंदिर असल्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना व सदर ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीमुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदरची मुतारी पाडणेबाबत परिसरातील नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. तरी, वॉर्ड क्र.७ मधील उदगाव वेस मरगुबाई मंदिर जवळील शंकर सायकल लगत असलेली मुतारी पाडणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

६. **<u>श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>**

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये विविध उच्च पदावर शासनाकडील गलेलठ्ठ पगाराचे अधिकारी प्रतिनियुक्तीवर नेमले जातात. त्यामुळे ड वर्ग महानगरपालिकेला न सोसनाऱ्या पगाराचा नाहक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्यामुळे सद्या शहर अभियंता या पदावर शासनाकडील अधिकाऱ्यांची नेमणूक न करता सद्या शहर अभियंता या पदावर चांगले काम करणारे महानगरपालिकेचे अनुभवी अधिकारी श्री.परमेश्वर हलकुडे यांचीच शहर अभियंता या पदावर नेमणूक करावी. त्यांनी यापूर्वी लातुर येथे झालेल्या किल्लारी येथे झालेल्या भूकंपामध्ये चांगले काम केलेले आहे. त्यामुळे शासनानेच त्यांना सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये अभियंता या पदावर नियुक्ती केलेले आहे. तरी, श्री.हलकुडे यांना यापुढेही शहर अभियंता म्हणून नियुक्ती देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

७. **<u>सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>**

सांगली येथील माधवनगर रोडवरील माळबंगला जलशुद्धीकरण केंद्राची जागा तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या सन १९८४ पासून मालकीची असताना तसेच सिटी सर्व्हेच्या दप्तरी त्याची रितसर नोंद असताना महानगरपालिकेची तसेच सभागृहाची दिशाभूल करुन खोट्या व बनावट ७/१२ च्या उताऱ्यानुसार महापालिकेच्या मालकीचीच जागा सुमारे ७ कोटी रुपयांना विकणेचा उद्योग सन २०१३ मध्ये झाला असून, सदर जागेच्या खरेदीसाठी महापालिकेने सदर रक्कम धनादेशाद्वारे अदा करुन रितसर जिल्हा निबंधकांसमोर खरेदीपत्र केलेले आहे. परंतु सदरचा व्यवहार हा खोट्या व बनावट ७/१२ चे आधारे केलेला असलेने व सदरची जागा यापूर्वी पासून म्हणजेच १९८४ पासून तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या मालकीची असलेने सन २०१३ पासून आज अखेर खरेदी केलेल्या २ हेक्टर ९१ आर इतक्या जागेवर नाव लागलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. सदर जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेवर सन १९७६ पासून जलशुद्धीकरण केंद्राचे आरक्षण असून ते आज अखेर कायम आहे. एकूण क्षेत्र ३ हेक्टर ८५ आर इतके आहे. या संपूर्ण क्षेत्राची नोंद सिटी सर्व्हे कार्यालयात सन १९८४ पासून असून, त्याची मालकी तत्कालीन सांगली नगरपरिषदेची आहे. यापूर्वी सन २००८ मध्ये याच मालकाने एकणू क्षेत्रापैकी ९४ आर इतकी जागा विकसनकर्ते शेखर माने व गंगवाणी यांना रक्कम रुपये दोन लक्ष मात्रला विकसीत करणेसाठी दिलेली आहे. या विकसनकर्त्यांनी तेथे इमारती बांधून कोट्यावधी रुपयांना ह्या विकल्या असून, कोट्यावधी रुपये कामावलेचे दिसून येते. वरील दोन्ही व्यवहार हे बेकायदेशीर व महापालिकेची फसवणूक करणारे आहेत या करीता महासभेमध्ये सखोल चर्चा होवून, महासभा ठराव क्र.६५ दि.०६/१०/२०१७ तहकूब दि.०९/१०/२०१७ अन्वये एकमताने मंजूर करुन महापालिकेची फसवणूक करणाऱ्यांवर फौजदारी दाखल करणेचे आदेश पिठासीन अधिकारी यांनी दिलेले होते. परंतु, आजअखेर सदर ठरावाची अंमलबजावणी करणेस प्रशासन जाणीवपुर्वक टाळाटाळ करीत असलेचे दिसून येते आहे. त्याकरीता महानगरपालिकेच्या मालकीची जागा महापालिकेला विकणाऱ्यांवर तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा महानगरपालिकेच्या पुर्व मान्यतेशिवाय विकसीत करुन कोट्यावधी रुपये लुटणाऱ्या विकसनकर्ते शेखर माने व गंगवाणी यांचेवर सुद्धा फौजदारी दाखल होणे गरजेचे आहे. तसेच, या फसवणूक करणाऱ्यांवर फौजदारी दाखल करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

८. **<u>श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>**

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तत्कालीन नगरपालिकेमध्ये अस्थापनेवर वैद्यकिय क्षेत्रातील मानद त्वचा रोगतज्ञ म्हणून श्री.डॉ.अरविंद पांडूरंग कुलकर्णी यांनी तत्कालीन नगर पालिकेकडील दवाखाना क्रमांक ७ कडे विना मोबदला त्वचा रोगाची सेवा या परिसरातील नागरिकांना दिलेली आहे. तरी त्यांच्या कामास पोच पावती म्हणून श्री.अरविंद पांडूरंग कुलकर्णी यांना सेवासन्मान पुरस्कार देणेबाबत आलेला प्रस्ताव.

९. <u>श्री.गणेश माळी,श्री.पांडूरंग कोरे,सौ.गायत्री कुल्लोळी, श्री.राजेंद्र कुंभार, श्री.विनायक सिंहासने, श्री.संजय मेंढे, सौ.बबिता मेंढे,सौ.संगिता हारगे, श्री.संतोष पाटील,सौ.पवित्रा केरीपाळे यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथे भव्य असे मिरज जक्शन असून, दररोज लाखोंच्या संख्येने प्रवाशांचा मिरज रेल्वे स्टेशन संपर्क येत असतो. मिरज येथील रेल्वे जंक्शनला महात्मा बसवेश्वर महाराजांचे नावे देणेसाठी मिरज परिसरातील नागरिकांची व समस्त लिंगायत समाजाकडून होत आहे. महात्मा बसवेश्वर महाराज हे लोकशाहीचे आद्य संकल्पक होत. जगातील पहिला लोकशाही संसद म्हणजे अनुभव मंटप ची स्थापना त्यांनी बाराव्या शतकामध्ये आपल्या देशात केली आहे. संपूर्ण भारतवासीयांना अभिमान वाटावा असा त्यांचा गौरवाचा इतिहास आहे. बाराव्या शतकामध्ये त्यांनी प्रधानमंत्री म्हणून कार्य करीत असताना आदर्श राज्य कारभार करुन दाखवला. भारत देशातील वेगवेगळ्या भागातील जनता अनुभव मंटपास भेट देवून त्यांनी कार्यपद्धती अनुभवलेची अनेक उदाहरणे आजही सर्वांना मार्गदर्शक ठरत आहेत. मिरज येथील रेल्वे जंक्शनला महात्मा बसवेश्वर महाराजांचे नाव देणेसाठी मिरज परिसरातील नागरिकांची व समस्त लिंगायत समाजाकडून होत असलेली मागणी आणि महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या कार्याचा यथोचित सन्मा व्हावा यासाठी मिरज येथील रेल्वे जंक्शनला जगद्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर महाराज जंक्शन असे नामकरण करणेस व तसा प्रस्ताव केंद्र शासन व भारतीय रेल्व प्रशासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता देणेसाठी सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेसाठी येत्या महासभेसमोर सादर करणेत यावा.

**१०. श्री.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

१. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका आणि तत्कालीन नगरपरिषदेपासून जे बदली सफाई कामगार सद्या वयाची ६० वर्षे पुर्ण झालेली आहेत म्हणून सेवेतून त्यांना कमी करण्यात आलेले आहेत आणि जे बदली सफाई कर्मचारी व रोजंदारी वरील कर्मचारी मयत झालेले आहेत त्या सर्वांच्या वारसांना बदली कामगार म्हणून सेवेत घेण्यासंबंधी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

२. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील पंप हाऊस विभागातील बदली कामगार गेली २५ ते ३० वर्षापेक्षा जास्त काळ पंप आपरेटर मदतनीस,प्रभारी पंप ऑपरेटर इलेक्ट्रीकल मेन्टनन्स् ,प्रभारी लॅब असिस्टंट, प्रभारी फीटर ऑपरेटर,प्रभारी मीटर रीडर,प्रभारी फीटर, मिटर रीडर मदतनीस या सर्व बदली कामगारांची सद्या काम असलेल्या पदांची प्रभारी नियुक्ती ऑर्डर देणेत यावी व त्यांना कुशल प्रवर्गामध्ये घेवून कुशल कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी लागू करावी म्हणून निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

३. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली आणि कुपवाडच्या पाणी पुरवठा विभागाकडे जे कर्मचारी मानधनावर मजूर म्हणून नियुक्ती केलेले कर्मचारी हे बरीच वर्षे फिटर,व्हॉलमन,चावीवाला अशा तांत्रिक पदांवर कर्तव्य बजावत आहेत. त्या सर्वांची मजूर ही मानधनावरची ऑर्डर बदलून ते सद्या ज्या पदावर काम करत आहेत त्या पदांची मानधनावरील नियुक्तीचे आदेश देवून त्यांना कुशल कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी लागू करावी म्हणून निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

**११. श्री.शिवाजी बाबुराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील लहान मोठे शासकीय व खाजगी दवाखाने,हॉस्पिटल, विविध चाचण्या करणाऱ्या लॅब इ.मधून दैनंदिन निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी महानगरपालिका क्षेत्रातील मिरज बेडग रोड येथील मनपाच्या खुल्या जागेमध्ये कॉमन इन्सिनेटर प्रकल्प उभारणेचा निर्णय घेणेत आला होता. त्यानुसार निविदा प्रसिद्ध करुन या प्रकल्पाचे काम इंडियन मेडिकल असो.मिरज यांना १० वर्ष मुदतीने मिळालेले आहे. ठेका मिळाले नंतर साधारण १ वर्ष काम सुरु राहिले परंतु, त्यानंतर सदरचा प्रकल्प बंद अवस्थेत दिसून येत आहे. सदर ठिकाणी बसविणेत आलेली यंत्रसामुग्री बंद अवस्थेत आहे. सदर मक्तेदाराने महानगरपालिकेस रॉयल्टी भरलेली नाही. तसेच, सदर मक्तेदाराने प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मान्यता घेतलेचे दिसून येत नाही. प्रकल्पाचे ठिकाणी कोणत्याही प्रकारची डागडूजी व खबरदारीचे उपाय केलेले नाहीत. प्रकल्प इमारतीचे / शेडची अत्यंत दुरावस्था झालेली आहे व ते केंव्हाही मोडकळीस येवून एखादी दुर्घटना होणेची शक्यता नाकारता येत नाही. यावरुन सदरचे मक्तेदार हे काम करणेस सक्षम नाहीत असे दिसून येत आहे व यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे व जैवीक कचरा उठाव न झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ही निर्माण झालेला आहे. या प्रकारामुळे दवाखाने,हॉस्पिटल व लॅब यांना जैविक कचऱ्याच्या विल्हेवाट लावणेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर मक्तेदाराचा उर्वरित ठेका रद्द करुन सदरचे काम करणेस तयार असलेल्या मक्तेदार यांना देणेसाठी चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

**१२. सौ.सुनंदा चंद्रकांत राऊत यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात होर्डिंगचा जाहिरात कराचा दर पुर्वी प्रति चौ.फुट १/- रुपया इतका होता. नंतर तो दर वाढ करुन प्रथमत: प्रति चौ.फुट रु.१२/- व नंतर पुन्हा हाच जाहिरात कर प्रति चौ.फुट रु.२५ इतका करणेत आला होता. मागील वर्षी महापूर व यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदर व्यवसाय पुर्णत / ठप्प झालेला आहे. सदर व्यवसाय हा मुंबई,पुणे यासारख्या मोठ्या शहरातील कंपन्यांवर अवलंबून आहे. कारोनाच्या पार्श्वभूमीवर व आर्थिक मंदी याचा मोठा फटका या व्यवसायाला बसला असून, सदर व्यवसायामध्ये होर्डिंगसाठी जाहिरात मिळणे कठीण झाले आहे. परिणामी सदर व्यवसाय अडचणीत आला आहे. सदर लोक हे मनपा क्षेत्रामध्ये असून, या व्यवसायाचा विचार करता या व्यवसायावरती बऱ्याच लोकांना रोजगार उपलब्ध होत असून या व्यवसायावरील बऱ्याच लोकांचा उदरनिर्वाह या वरती अवलंबून आहे. त्यामुळे होर्डिंग व्यवसायाचा व्यवसायवृद्धीच्या अनुषंगाने विचार करता होर्डिंगचा जाहिरात कर दर सुधार समितीने व महासभेने घेतलेल्या दि.२० डिसेंबर २०१९ चा महासभा ठराव क्र.१४१ विषय क्र. ८ नुसार जाहिरात कर प्रति चौ.फुट ५०/- दराबाबतचा घेतलेल्या निर्णयाचा फेर विचार करावा.

महापूर आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हार्डिंगचा जाहिरात कर मार्च २०२२ या वर्षा अखेर पर्यत मागील दराप्रमाणे फॉर्म फी,अनामत रक्कम, जाहिरात कर प्रति चौ.फुट २५/- व इतर कर आकारणेत यावेत व एप्रिल २०२२ पासून होर्डिंग जाहिरात कर दर प्रति चौ.फुट ३५/- इतका आकारणेत यावा यासाठी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

**१३. श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ क येथील विनायकनगर हनुमान मंदिर परिसर येथे मनपा ओपन स्पेसमध्ये अमृत अभियान हरित क्षेत्र विकास योजनेंतर्गत उद्यान विकसीत करणेत आले असून, सदर उद्यानास लोकनेते राजारामबापू पाटील उद्यान असे नामकरण करणेची मागणी सदर भागातील नागरिकांकडून होत आहे. यासाठी सदर उद्यानास लोकनेते राजारामबापू पाटील उद्यान असे नामकरण करणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : १५ /०१/२०२१.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ५४

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील मंगळवार बाझार येथील खोकी पुर्नवसन व्यापारी संकुलनाचे श्री.महालक्ष्मी व्यापारी संकुल असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ७५

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील जुना रेल्वे स्टेशन येथील एस.एफ.सी.मेगा मॉलच्या पिछाडीस मनपा मार्फत १८४ गाळे बांधण्यात आलेल्या मार्केटला श्री.साई मार्केट असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ७६

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सिटी हायस्कूल रोडचे बृहत्रयीरत्न वैद्यराज दातारशात्री मार्ग असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देणे या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर मार्गास यापुर्वी नामकरण झाले असल्याने, सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- श्री: विनायक सिंहासने

अनुमोदक :- श्री:पांडूरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मा. महासभा ठरावाची प्रत

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ७७

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ कुपवाड मधील रामकृष्ण नगर चौकातून शालिनीनगरकडे जाणाऱ्या १०० फुटी रस्त्यास साथी स्व.बिराज साळूंखे मार्ग असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे.

महापौर,

महासभा ठराव प्रमाणित

नगरसचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ७८

विषय क्रमांक :- ०८

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.११/०१/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली त्रिकोणी बाग येथून गल्ली नं.२ आतील बाजूस लालबाग गणेश मंदिर असून, नागरिकांना मंदिर पत्ता लगेच समजनेकरीता त्रिकोणी बाग कॉर्नर येथील चौकास लालबाग कॉर्नर असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, सदर प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडूरंग कोरे

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- **७९**

विषय क्रमांक :- ०९

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका मालकीच्या विजयनगरमधील सत्राळकर चौकातील स.नं.३०/२अ व ३०/२ब मधील क्षेत्र ५२३.०० चौ.मी.जागा भाडेतत्वावर ई-लिलाव पद्धतीने देणेसाठी ई-लिलावामध्ये उच्चत्तम बोली श्री.संदिप तुकाराम टेंगले यांची र.रु.८,२९,७४०/- इतकी असून, महापालिकेच्या व सदर लिलावातील इतर नमुद शर्ती-अटीस अधिन राहून श्री.संदिप तुकाराम टेंगले यांच्या नावाने सदर जागा भाडेपट्टाने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत असून, सदर भाडेपट्टयाची मुदत संपलेनंतर सदरची जागा प्रशासनाने ताब्यात घेवून, सदर जागेचा आवश्यकतेप्रमाणे भाडेपट्टयाने देणेसाठी ई-लिलाव करावा तसेच, सदर जागेच्या भाडेपट्टा करारास कोणत्याही परिस्थितीत मुदत संपलेनंतर मुदतवाढ देणेत येवू नये असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ८०

विषय क्रमांक :- १०

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका हद्दीतील सि.स.नं.१०८६ मधील प्रतापसिंह उद्यान येथील ३० चौ.मी.इत्यादी आर.सी.सी.बांधकाम व त्या बांधकामाने व्यापलेली जागा भाडेतत्वावर ई-लिलाव पद्धतीने देणेसाठी उच्चत्तम बोली श्री.दादासाहेब जयवंत सरगर यांची र.रु.१,०३,००४/- इतकी असून, सदर लिलावातील इतर नमुद शर्ती-अटीस अधिन राहून श्री.सरगर यांच्या नावाने भाडेपट्टाने देणेस मान्यता देणेकामी प्राप्त प्रस्तावावर सभागृहात झाले चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री पांडुरंग कोरे — महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ८१

विषय क्रमांक :- ११

सोबतचे प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.२२/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील र.रु.२.९३ कोटी रक्कमेची कामे निश्चित करुन घेवून, सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी प्राप्त प्रस्ताव सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सर्वसाधारण वार्षिक योजना सन २०२०-२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महापालिकेस र.रु.२.९३ कोटीची कामे प्रस्तावित करणेकामी चर्चा सुरु असताना, शहर अभियंता यांनी उपरोक्त अभियांनांतर्गत महापालिकेस एकूण र.रु.७ कोटी पर्यंतचा निधी मंजूर होणार असलेचे सभागृहात विदित केले त्यानुसार सदर अभियानांतर्गत र.रु.७ कोटी रक्कमेचा खालील नमुद कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | प्रस्तावित विकास कामे | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | सांगली खणभाग पाटणे गल्ली येथील द.+उ. रस्ता पाटणे बिल्डींग ते ख्रिस्ती विश्वासी मंडळ पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४३९९०० |
| २ | वॉर्ड क्र.१६ खणभाग भांडवले गल्ली गरीब नवाज मश्चिद मागील रस्ता कॉंक्रिट करणे तसेच पी.सी.सी. गटर करणे. | ६६७४०० |
| ३ | वॉर्ड क्र.१६ मधील स्टेशन रोड येथील टॉप इन टाऊन दुकान ते भोसले कॉम्प्लेक्स कॉंक्रिटकरण व ठीक ठिकाणी कॉंक्रिटकरण करणे. | ३३१४०० |
| ४ | सांगली वखारभाग श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज मठ ते श्री दत्त मोटर्स द.+उ. रस्ता डांबरीकरणाने सुधारणा करणे. | १००८४०० |
| ५ | वॉर्ड क्र.१२ मधील ईदगाह रस्ता शाम विभुते घर ते महेश पाटील घर पांजरपोळ समोरील पु.+प. रस्ता डांबरीकरणाने सुधारणा करणे. | ५०९९०० |
| ६ | वॉर्ड क्र.१० मधील पटेल सॉ मिल ते भारत गॅस गोडावून पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १५००००० |
| ७ | वॉर्ड क्र.१९ क्रांतीनगर मनपा ओपन स्पेस ला कंपाऊंड भिंत बांधणे. | ९६०००० |
| ८ | वॉर्ड क्र.१९ वानलेसवाडी श्रीरामनगर अंतर्गत पी.सी.सी. गटर करणे. | ४९७००० |

... २ ...

| | | |
|---|---|---|
| ९ | वॉर्ड क्र. १० सांगली मार्केट कमिटी कर्मचारी हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १५००३०० |
| १० | वॉर्ड क्र.१५ गणेशनगर ५ वी गल्ली "T"टाईप रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११४५००० |
| ११ | सांगली वॉर्ड क्र.१७ मनपा ओपन स्पेस मोती चौक सभागृहा भोवती वॉल कंपाऊंड करणे. | १९३०१०० |
| १२ | कुपवाड प्रभागातील वार्ड क्र ८ मधील सदानंद पार्क व उत्कर्ष नगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०००००० |
| १३ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.१ छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथील स्वाती गॅस एजन्सी (१०० फुटी रोड) ते संजय बेडगे घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे. | १४९८२०० |
| १४ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.२ वाघमोडेनगर मधील खांडेकर घर ते शेंडगे घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ५३७००० |
| १५ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.२ शिवशक्तीनगर मधील हेमंत जगताप घर ते मुल्ला घर ते दिलीप मोरे घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे. | ९७७००० |
| १६ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.८ क्रांतिसिंह नाना पाटील सोसायटी मधील धनराज जाधव घर ते उमेश जाधव घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे. | ३०८३०० |
| १७ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.८ सुखकर्ता पार्क मधील स्वप्नपूर्ती बंगला ते शिवम बंगला व साबळे घरालगतचा रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे. | ७३१४०० |
| १८ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.८ सत्यसाईनगर मधील श्रीकृपा हाईटस अपार्टमेंट ते उदय बंगला पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे. | ४६४५०० |
| १९ | मिरज वॉर्ड क्र.५ झन्याबाबा दर्गा मागील रस्ते डांबरीकरण करणे. | १४३४००० |
| २० | मिरज वॉर्ड क्र.५ भिमनगर अंतर्गत रस्ते कॉंक्रिट करणे. | १४६३९०० |
| २१ | मिरज वॉर्ड क्र.४ मधील ठाणेदार वकील घर ते छत्रे घर रस्ता हॉटमिक्स करणे. | १४००२०० |
| २२ | मिरज वॉर्ड क्र.३ मधील साईनंदन अपार्टमेंट ते ओमासे अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १३८११०० |
| २३ | मिरज वॉर्ड क्र.४ संभा तालीम ते हिरेमठ घर ते ढेरे घर ते गुरव घर पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स करणे. | १४४५७०० |
| २४ | मिरज वॉर्ड क्र.३ महाबळ फार्म हाऊस ते द ट्रु क्लब व महाबळ ॲटो समोरील रस्ता हॉटमिक्स करणे. | १५२३८०० |
| २५ | सांगली वॉर्ड क्र.१७ मधील मनपा त्रिकोणी बागेस कंपौंड करणे | ४७००००० |
| २६ | सांगली वॉर्ड क्र.१७ मधील मनपा त्रिकोणी बागेमध्ये धबधबा तयार करणे. | १९२१००० |
| २७ | सांगली वॉर्ड क्र.१७ उष:काल हॉस्पिटल ते महेश शहा हॉस्पिटल पर्यतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | १२००००० |
| २८ | सांगली वॉर्ड क्र.१७ मधील निशांत कॉलनी येथील मनपा ओपनस्पेसला महादेव मंदिर समोर कंपौंड वॉल बांधणे. | १४००००० |
| २९ | सांगली वॉर्ड क्र.१७ लालबाग गणेश मंदिर ते केडगे घर पर्यत आर सी सी गटर करणे | ७११५०० |

| | | |
|---|---|---|
| ३० | सांगली वॉर्ड क्र.१७ दिलिप टायर्स ते माळी थिअटर पासून चांदणी चौक पर्यतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | ८८८९०० |
| ३१ | सांगली वॉड्र क्र.१७ जिनवाणी बंगला ते सुमेल बंगल्या पासुन धामणी रोड पर्यतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | ७५२००० |
| ३२ | वॉर्ड क्र.९ लोकल बोर्ड कॉलनी मधील श्री.कृष्ण अपार्टमेंट ते धवल अपार्टमेंट शांताई घर ते शितल पाटील घर आणि जयराम घरासमोरील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | १३७९९०० |
| ३३ | कुपवाड वॉर्ड क्र.९ट्रेजर पार्क मधील शिवशक्ती ॲनेक्स ते रत्नदिप ते इंद्रनिल घर व राजेंद्र जाधव घर ते गणेश घरापर्यतचा रस्ता हॉटमिक्स करणे | ६६२६०० |
| ३४ | कुपवाड वार्ड क्र ९ मधील अहिल्यादेवी हौसिंग सोसायटी मधील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेस वॉल कंपाऊंड करणेबाबत. | १२९९८०० |
| ३५ | वॉर्ड क्र.९ रानडे मळा मधील सचिन ज्वेलर्स ते वैभव अपार्टमेंट पर्यत आर सी सी गटर करणे | १८८१३०० |
| ३६ | वॉर्ड क्र.९ नेहरुनगर फिरोज तांबोळी घर ते दिलीप देसाई घर खडीकरण व मुरमीकरण करणे | ८५२१०० |
| ३७ | वॉर्ड क्र.९ मध्ये सि.स.नं.६६५५/१३ येथे सायन्स गार्डन विकसीत करणे | २०००००० |
| ३८ | वॉर्ड क्र.१६ मधील संजोग कॉलनी परिसरातील अंतर्गत गटारी व लक्ष्मी महिला बँक मागील मनपा हजेरी शेड जवळील पी.सी.सी. गटर करणे | ७००००० |
| ३९ | वॉर्ड क्र.१८ मधील मिलन गादी कारखाना पिछाडीस गल्ली नं.४ येथे पी.सी.सी. गटर करणे | ५००००० |
| ४० | सांगली वॉर्ड क्र.१४ मधील विधाता चौक केशवनाथ मंदिर ते नवभारत चौक रस्ता हॉटमिक्स करणे. | ५००००० |
| ४१ | सांगली वॉर्ड क्र.१४ मधील गांवभाग बाळेकुंद्री महाराज मठ ते बापट घर बावडेकर वाडा रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. | ५००००० |
| ४२ | सांगली वॉर्ड क्र.१४ मधील माकडशिंगी पोलीस चौकी ते विसावा चौक ते गुरुनाथ कुलकर्णी घरा पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ५००००० |
| ४३ | सांगली वॉर्ड क्र.१४ मधील रणझुंझार चौक व राजारामबापु बँक येथे हायमास्ट पोल उभारुन LED लाईट बसविणे. | ५००००० |
| ४४ | वॉर्ड क्र.१९ मधील विश्रामबाग तानवडे प्लॉट मनपा ओपनस्पेस विकसीत करणेबाबत | १०९३६०० |
| ४५ | वॉर्ड क्र.७ मधील कोळेकर मठ (खुरपे घर) पासून मळवाडे घरा पर्यंत रस्ता करणे. | ६००००० |
| ४६ | वॉर्ड क्र.२ मधील शिवशक्ती नगर येथील अंतर्गत रस्ते बी.बी.एम.सिलकोट करणे. | ५००००० |
| ४७ | मिरज वॉर्ड क्र.१२ मधील शिवशंभो चौक जवळील बायपास रोड येथे श्री.गणेश फॅब्रिकेशन ते माऊली बंगला तसेच सलीम महात ते आनंदा सरगर द+उ रस्ता डांबरीकरणाने सुधारणा करणे. | ७००००० |
| ४८ | वॉर्ड क्र.१८ कोल्हापूर रोड आकाशवाणी जवळील सुभाषनगर गल्ली नं.५ येथील रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००० |
| ४९ | वॉर्ड क्र.७ मधील समतानगर जगताप घर ते नानु आजी घर व जोसेफ गेस्ट ते मायकल व्हिला पिंटू घर रस्ता या ठिकाणी गटर करणे. | १०००००० |

| | | |
|---|---|---|
| ५० | प्रभाग क्र. ११ मधील शांतीनिकेतन येथील त्रिमुर्ती बंगलो ते हरिश्चंद्र बंगलो पर्यंत रस्ता हॉटमिक्स करणे. | १०५८२०० |
| ५१ | सांगली वार्ड क्र १५ मधील फौजदार गल्ली येथील एडके घर ते अतुल सावंत घरापर्यतची गटार तसेच एडके घर ते इश्वर सावंत घरापर्यतची गटार नुतणीकरण करणे. | १०००००० |
| ५२ | प्रभाग क्र. १८ मधील रंगनाथ दांडेकर मार्ग लक्ष्मीनगर गल्ली क्र. १ मुख्य रस्त्यात ९ मीटर उंचीचे खांब टाकणे. | ५००००० |
| ५३ | प्रभाग क्र. ११ मधील केशव कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरकरण करणे. | १०५८२०० |
| ५४ | प्रभाग क्र. १० मधील सर्वोदय कॉलनी येथील युवराज पवार घर ते गजानन पवार घर आणि जनाबाई घर ते नारायण वडर घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ७००००० |
| ५५ | मिरज वार्ड क्र ५ मधील मिरज बोलवाड रोड, दुर्गाडे मळा व कोरे मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ९९५२०० |
| ५६ | वॉर्ड क्र.१० मधील स.नं.२९६/२ अ मध्ये कोंची कोरवी माकडवाले समाजासाठी सामाजिक सभागृह बांधणे | ९००००० |
| ५७ | वार्ड क्र.१६ पंचमुखी मारुती रोड ते स्वराज चहा ते मंदार अपार्टमेंट कणसे गल्ली पी.सी.सी. गटर करणे. | ४७९५०० |
| ५८ | वार्ड क्र. १६ जयभवानी रोड येथील भिमराव बिल्डिंग ते गणपती मुळे घर तसेच कार्लेकर घर ते श्रीपाद चिरमुरे पर्यंत पूर्व पश्चिम रस्त्यास गटार करणे. | ५५९४०० |
| ५९ | मिरज वार्ड क्र ६ मधील धनगर गल्ली ते बिरोबा मंदीर ते कामगार भवन रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १७११७०० |
| ६० | मिरज वार्ड क्र ६ मधील उमर फारुख मशीद ते यादगार फोटो स्टुडिओ रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १३०९७०० |
| ६१ | मिरज वार्ड क्र २० मधील खतीब हॉल पासुन निलजी बामणीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००० |
| ६२ | मिरज वार्ड क्र २० मधील मिरज कृष्णा घाट रोड पारधी वसाहत मधील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ९०८००० |
| ६३ | सांगलीवाडी वॉर्ड क्र.१३ सांगली इस्लामपूर रोड आदर्श नागरी पतसंस्था ते बाळे अलदर घर पु.प.रस्ता सुधारणा करणे | ६५३६०० |
| ६४ | मिरज वॉर्ड क्र.४ आदर्श क्लास ते ज्युबिली कन्या शाळा व हरबा तालीम ते शक्ती डेअरी पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स करणे. | २१३३२०० |
| ६५ | मिरज वॉर्ड क्र.४ कारंडे गल्ली येथील बोळ रस्ते सुधारणा करणे. | ७००००० |
| ६६ | मिरज वार्ड क्र ६ मधील सुगारे बोळ, सन्मुख बोळ, शालिमार बोळ रस्ते सुधारणा करणे. | ८००००० |
| ६७ | कुपवाड वार्ड क्र १ मधील प्रकाशनगर गल्ली क्र. ३ परिसरातील कमल बेकर्स ते संदीप मोबाईल सप्लाय ते हिंदुराव अवघडे घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११८२४०० |
| | **एकूण रक्कम रुपये** | **७००४६३००** |

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.पांडूरंग मार्तंड कोरे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील खालील एकूण ५६ कामांचा एकूण र.रु.१८,६२,३८,१८०/- इतका वाढीव निधी मिळणेबाबत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|
| १ | कुपवाड स.नं.४८२/१ येथील खुल्या जागेत बगीचा विकसीत करणे | ४१००००० |
| २ | कुपवाड स.नं.३ /१ मध्ये स्व.मदनभाऊ मिनी स्टेडियम मध्ये वॉल कंपौंड व क्रिडांगण विकसीत करणे | १०००००००० |
| ३ | मिरज येथील न्यु इंग्लिश स्कूल पिछाडीस मनपा मालकीच्या जागेवर क्रिडांगण विकसीत करणे | २००००००० |
| ४ | मिरज येथील तालुका क्रिडा संकुल पिछाडीस मनपा मालकीच्या जागेमध्ये बगीचा विकसीत करणे | १००००००० |
| ५ | सांगली प्रतापसिंह उद्यान विकसीत करणे | २००००००० |
| ६ | सांगली छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम विकसीत करणे | २००००००० |
| ७ | सां.मि.कु.मनपा क्षेत्रातील दि.सेनसॅक्स (वृक्षगणना) करणे | १००००००० |
| ८ | मनपा क्षेत्रात सोलर ट्री उभा करणे | ५०००००० |
| ९ | मनपा क्षेत्रामध्ये मनपाच्या वतीने महिला भवन बांधणे | २००००००० |
| १० | सांगली येथील काळीखण येथे कारंजा विकसीत करणे | १००००००० |
| ११ | मिरज धनगर गल्ली येथे बिरोबा देवालय सांस्कृतिक भवन बांधणे | ५०००००० |
| १२ | वॉर्ड क्र.७ मधील समतानगर येथील अक्सा मस्जिद दर्यावर्दी घर ते तोडकर घर ते सुंदर निवास पर्यंत पी.सी.सी. गटर करणे. | १५०७७०० |
| १३ | वॉर्ड क्र.१९ मधील गर्व्हमेंट कॉलनी येथे विविध ठिकाणी हायमास्ट बसविणे | ६००००० |
| १४ | वॉर्ड क्र.१९ मधील गणेश अंगडी घर ते श्रीकांत खंडागळे घरा पर्यंतचा रस्ता बी.बी.एम. डांबरी करणे. | ५५०००० |
| १५ | प्रभाग क्र.५ बी.चा मळा येथील रावसाहेब मुत्तूरे घर ते मिरज ओढा रस्ता डांबरीकरण करणे. | ६३६८०० |
| १६ | वॉर्ड क्र.११ मधील चिंतामणी केशव कॉलनी परिसरातील उत्तर बाजूस पू.प.आर.सी.सी. गटर करणे. | ११२७७०० |
| १७ | कुपवाड प्रभागातील वार्ड क्र १ मेन रोड साजीद गॅरेज ते नाल्यापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ९९८९०० |
| १८ | कुपवाड वार्ड क्र १ मधील प्रकाशनगर गल्ली क्र. ३ परिसरातील कमल बेकर्स ते संदीप मोबाईल सप्लाय ते हिंदुराव अवघडे घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११८२४०० |
| १९ | कुपवाड प्रभागातील वार्ड क्र २ वाघमोडेनगर मधील तरटे घर ते नाना मासाळ घरापर्यंतचा रस्ता पी.सी.सी.करणे. | ९९८५०० |

| | | |
|---|---|---|
| २० | मिरज वार्ड क्र ५ मधील मिरज बोलवाड रोड, दुर्गाडे मळा व कोरे मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ९९५२०० |
| २१ | मिरज वार्ड क्र ६ मधील सुगारे बोळ, सन्मुख बोळ, शालिमार बोळ रस्ते सुधारणा करणे. | ८००००० |
| २२ | मिरज वार्ड क्र ६ मधील दर्गा चौक महाराष्ट्र बेकरी ते वड्ड घर ते कॉर्नर टेलर ते मुस्लीम मोहल्ला ते कबाडे गल्ली नकाते घर रस्ता डांबरीकरण करणे. | १२४४२०० |
| २३ | मिरज वार्ड क्र ६ मधील उमर फारुख मशीद ते यादगार फोटो स्टुडिओ रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १३०९७०० |
| २४ | वॉर्ड क्र.१६ गोसावी गल्ली सम्राट व्यायाम मंडळ मागे बलवंत हेरिटेज ते दिनेश पुजारी घर द.+उ. रस्ता पश्चिम बाजूस पी.सी.सी. गटर करणे. | २७७१०० |
| २४ | कुपवाड प्रभागातील वार्ड क्र ८ मधील सदानंद पार्क व उत्कर्ष नगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०००००० |
| २५ | कुपवाड वार्ड क्र ९ मधील अहिल्यादेवी हौसिंग सोसायटी मधील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेस वॉल कंपाऊंड करणेबाबत. | १४९९८०० |
| २६ | सांगली वार्ड क्र १५ मधील फौजदार गल्ली येथील एडके घर ते अतुल सावंत घरापर्यंतची गटार तसेच एडके घर ते इश्वर सावंत घरापर्यतची गटार नुतणीकरण करणे. | १०००००० |
| २७ | सांगली वार्ड क्र. १६ मधील असिफ बावा घर ते संजय शिंदे किराणा दुकान द.+उ. रस्त्यास पश्चिम बाजुस पी.सी.सी गटर करणे. | ६९६८०० |
| २८ | सांगली वार्ड क्र. १६ मधील सुलतान फकीर घर ते चिंगिशा बावा दर्गा (मकान) पु.+प. रस्त्यास उत्तर बाजुस पी.सी.सी. गटर करणे. | ३४७२०० |
| २९ | सांगली वार्ड क्र १७ धनगर गल्ली (विठ्ठन रुक्मिणी मंदीर) येथील महानगरपालिकेच्या खुली जागा वॉल कंपाऊंड बांधणे. | ११५२००० |
| ३० | मिरज वार्ड क्र २० मधील काळी मशीद ते कनवाडकर हौद रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १०६६००० |
| ३१ | मिरज वार्ड क्र २० मधील खतीब हॉल पासुन निलजी बामणीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००० |
| ३२ | मिरज वार्ड क्र २० मधील मिरज कृष्णा घाट रोड पारधी वसाहत मधील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ९०८००० |
| ३३ | वॉर्ड क्र.१५ रमामातानगर डी.पी. रोड कत्तलखाना चौक ते (नुराणी मश्चिद समोरील रस्ता) मुनीर आत्तार घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११३०००० |
| ३४ | सांगली वॉर्ड क्र.१८ मधील शामरावनगर येथील देवेंद्र सोसा. येथील मुजावर वाळू डेपो ते माने घरापर्यंत पी.सी.सी. गटर करणे | ४९९८०० |
| ३५ | वॉर्ड क्र.८ मधील पाटील डॉक्टर घर ते गौडर घर पर्यंतचा रस्ता बी.बी.एम. डांबरीकरण करणे | ५००००० |
| ३६ | मिरज वॉर्ड क्र.३ मधील पंढरपुर रोड जवळ लक्ष्मी पार्क (तोडकर प्लॉट) येथे गोसावी समाज मंदिर पासून किरण अडसुळे घर ते माने घर पर्यंतचा रस्ता बी.बी.एम.सिलकोट करणे. | ९५०००० |
| ३७ | वॉर्ड क्र.१४ मधील कोल्हापूर रोड, राम नगर १ ली गल्ली गजानन पिठाची गिरणी ते पन्हाळकर गॅरेज पू+प रस्ता उलट बाजूस आर.सी.सी. गटर करणे. | ५५०००० |

| | | |
|---|---|---|
| ३७ | प्रभाग क्र.१४ मधील सतिश पवार घर ते लक्ष्मी मंदीर व समर्थ अपार्टमेंट ते खिलारे वाड्या पर्यंत जुने पेव्हींग काढून रस्ता कॉंक्रिट व पी.सी.सी. गटर करणे. | ५०००००० |
| ३९ | वॉर्ड क्र.१०(अ) मधील कलानगर महादेव मंदिर प्रविण काटे यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ५२२४०० |
| ४० | वॉर्ड क्र.७ मधील इसापुरे गल्ली महादेव मंदिर येथील पहिला मजला विकसीत करणे. | १४९९००० |
| ४१ | वॉर्ड क्र.१९ मधील माळवदे घर ते सगरे घरा पर्यंत आर.सी.सी. गटर करणे | २०००००० |
| ४२ | प्रभाग क्र. १५ मधील १०० फुटी रोड पाकिजा मसजिद समोरील जनता पान शॉप ते सुयश अपार्टमेंट पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे. | ९४६२८० |
| ४३ | वॉर्ड क्र.११ मध्ये इंदिरा कॉलनी येथील रस्त्यास पी.सी.सी.गटर करणे | १०००००० |
| ४४ | मिरज वॉर्ड क्र.३ मधील अष्टविनायक नगर येथील रस्ता डांबरीकरण करणे | २४९६५०० |
| ४५ | मिरज वॉर्ड क्र.४ मधील सांगलीकर मळा कानडे कॉलनी येथील मनपा खुल्या जागेस कंपौंड भिंत बांधणे | ९१५७०० |
| ४६ | मिरज वॉर्ड क्र.४ सांगलीकर मळा येथील बकुी बाग कॉलनी येथील मनपा खुल्या जागेस कंपौंड भिंत बांधणे | १८२८५०० |
| ४७ | मिरज वॉर्ड क्र.४ आहूजा पार्क मनपा ओपन स्पेस मध्ये बगीचा विकसीत करणे | ३२००००० |
| ४८ | नळभाग थोरात किराणा दुकान ते राऊत घर मुल्ला घर ते पाकजादे घर पी सी सी गटर करणे | ८०९९०० |
| ४९ | मिरज वॉर्ड क्र.७ मधील अंतर्गत रस्ते करणे. | ३०००००० |
| ५० | सांगली वॉर्ड क्र.११ शिवाजी हौसिंग सोसा.येथील मनपा ओपन स्पेसला कंपौंड वॉल बांधणे. | १९९७१०० |
| ५१ | सांगली वॉर्ड क्र.११ येथील जासूद मळा रोड हॅपी होम समोरील एल टाईप रस्ता सुधारणा करणे. | १८७८५०० |
| ५२ | वॉर्ड क्र.११ नानीबाई मळा मनपा ओपन स्पेसला कपौंड वॉल करणे | १६५९८०० |
| ५३ | सांगलीवाडी येथील कुंभार गल्ली येथील कॉंक्रिट रोड चरीसह दुरुस्ती करणे. | १४५६४०० |
| ५४ | वॉर्ड क्र.१३ सांगलीवाडी नवयुवक चौक वसंत पाटील घर ते कोठावळे घर पु.प.रस्ता सुधारणा करणे | ७१०१०० |
| ५५ | विठ्ठल मंदिर ते नारायण जोशी घर ते मनपा शाळा नं.१६ पंत एल टाईप रस्ता सुधारणा करणे | ५३६६०० |
| ५६ | सांगलीवाडी वॉर्ड क्र.१३ सांगली इस्लामपूर रोड आदर्श नागरी पतसंस्था ते बाळे अलदर घर पु.प.रस्ता सुधारणा करणे | ६५३६०० |
| | **एकूण र.रु.** | **१८६२३८१८०** |

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या समाजकल्याण समितीच्या सन २०२०-२१ सालाकरीता लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती व दलितेत्तर सुधार योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील खालील एकूण ७२ कामांचा एकूण र.रु.१२,०१,१४,७००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| १ | सांगली येथील काळीखण व परिसर सुशोभिकरण करणे. | १२८३३९१४ |
| २ | कुपवाड वॉर्ड क्र.१ श्री सदगुरू स्टोअर ते धनाजी माने घर अलंकार कॉलनी येथे पी सी सी गटर करणे | १२५०२०० |
| ३ | कुपवाड वॉर्ड क्र.१ कापसे प्लॉट अंतर्गत गणेश मंदिर ते कपील शिंदे घर ते शुभम किराणा स्टोअर्स ते अमित बनसोडे पर्यंत पी सी सी गटर करणे | १५७१००० |
| ४ | कुपवाड वॉर्ड क्र.१ अवधूत कॉलनी ओपन प्लॉट ते विष्णू हजारे घर ते अस्मिता घरापर्यंत खडिकरण व डांबरीकरण करणे | ६७९४०० |
| ५ | कुपवाड वॉर्ड क्र.१ मिठे घर ते सचिन दुग्धालय ते संभाजी चौक ते कापसे प्लॉट बी बी एम करणे | १३३७५०० |
| ६ | कुपवाड वॉर्ड क्र.१ वसंतनगर मधील ओम क्लिनीक ते ओपन प्लॉट पर्यंत आर सी सी गटर करणे | १७५५६०० |
| ७ | कुपवाड वॉर्ड क्र.२ शरद नगर कसबे घर ते मातोश्री बंगला पळवळकर घर ते संतोष बंडगर घरापर्यंत पी सी सी गटर करणे | १११४८०० |
| ८ | कुपवाड वॉर्ड क्र.२ स्वप्नपुर्ती बंगला ते संतोष बंडगर बंगला शरद नगर वॉटर टॅन्क कॉंक्रीटीकरण करण | २९५४०० |
| ९ | कुपवाड वॉर्ड क्र.२ कुपवाड मोहिते गल्ली माऊली बंगला तनया ब्युटी पार्लर परिसरात कॉंक्रीट रस्ता करण | ३१५८०० |
| १० | कुपवाड वॉर्ड क्र.२ स्वामी मळा गावडे घर ते सावळे घर ते स्वामी घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | १०१२७०० |
| ११ | कुपवाड वॉड क्र.२ स्वामी मळा अदिनाथ वाफळे घ्र ते थोरात घरापर्यंत पी सी सी गटर करणे | १४५३६०० |
| १२ | कुपवाड वार्ड क.२ बजरंगनगर ओलेकर दुकान परिसर माने घर ते सोनुर घर व मस्जीत दक्षिणेस पी सी सी गटर करणे | १२४३४०० |
| १३ | कुपवाड वॉर्ड क्र.२ कै बाबुराव कुपवाड खुले नाटयगृहाचे उत्तर बाजूचा पुर्व पश्चिम रस्ता कॉंक्रीट करणे | ५४३४०० |
| १४ | कुपवाड वॉर्ड क्र.२ रॉयल सिटी पुर्व गेट ते राजरत्न किराणा पर्यंतचा रस्ता रुंदिकरण कॉंक्रिट करणे | ७९९८०० |
| १५ | मिरज वॉर्ड क्र.०३ मिरज जुना गट नं.१८/२ नवीन १६/२ मधील महापालिकेच्या खुल्या जागेस कंपाउंड करणे | २७४८००० |
| १६ | मिरज वॉर्ड क्र.३ संजयनगर झोपडपटटी येथे पुर्व बाजूस रस्ते कॉंक्रीट करणे | २४५०००० |
| १७ | मिरज वॉर्ड क्र.३ संजयनगर झोपडपटटी येथे पश्चिम बाजूस रस्ते कॉंक्रीट करणे | २४५०००० |
| १८ | मिरज वॉर्ड क्र.७ मिरज सांगली वेस अंतर्गत चांभार गल्ली बोळ रस्ते सुधारणा करणे | २५३३६०० |
| १९ | मिरज वॉर्ड क्र.०७ वसंत कॉलनी वसंत बहार चंद्रपटटी घर शेजारी व शिवाजीनगर रस्ते सुधारणा करणे | २९७३००० |
| २० | मिरज वॉर्ड क्र.०७ अभिनव शाळा ते नागोबा मंदिर रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | २२,६७,७०० |

... ९ ...

| | | |
|---|---|---|
| २१ | कुपवाड वॉर्ड क्र.८ knd सोसा घाडगे घर ते काळे घरा पर्यंत रस्ता साईडपटटी सह खडिकरण व डांबरीकरण करणे | २०५९९०० |
| २२ | कुपवाड वॉर्ड क्र.८ शाहू नगर दरेश्वर सर्व्हिसिंग सेंटर व जाधव घर ते स्वराज्य बंगला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ४२६८०० |
| २३ | कुपवाड वॉर्ड क्र.८ शाहुनगर सतिश सांगले घर ते शाहू अपार्टमेंट हॉटमिक्स डांबरीकरण करणे | ११७१७०० |
| २४ | कुपवाड वॉर्ड क्र.८ विनायक नगर गल्ली नं.२ आदर्श जेन्टस पार्लर ते गुडमणी घरापर्यत रस्ता खडिकरण साईड पटटीसह डांबरीकरण करणे | १५००००० |
| २५ | कुपवाड वॉर्ड क्र.८ शाहुनगर मंगलमुर्ती सलून ते शैलेश आवळे घर फुल राउंड गटर करणे | १३८८००० |
| २६ | सांगली वॉर्ड क्र.१० जासुद मळा पत्रकार नगर सुदर्शन बंगला टी टाईप रस्ते करणे जासूद मळा रोड पाटील घ्र ते शिवदत्त कॅपीटल रोड | २९५०००० |
| २७ | सांगली वॉर्ड क्र.१० गजानन साबळे घर ते गोकुळ नगर रोड हॉटमिक्स डांबरीकरण करणे | ५९०००० |
| २८ | सांगली वॉर्ड क्र.१० दगडी गोडावून ते चेतना रस्ते दोन्ही बाजूस फुटपाथ करणे | ३७०००० |
| २९ | सांगली वॉर्ड क्र.१० गुरुव्दार समोरील झोपडपटटी रस्ते नं.१,२,३,४,५,६ रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | ४७५००० |
| ३० | सांगली वॉर्ड क्र.१०नविन वसाहत येथील सभागृह दुसरा मजला बांधणे | २९९८५११ |
| ३१ | सांगली वॉर्ड क्रं.११ मंगलमुर्ती कॉलनी येथील वसंत घर ते कुलकर्णी घरापर्यत आर सी सी गटर करणे. | १३५३७०० |
| ३२ | सांगली वॉर्ड क्रं.११ मधील संजयनगर मंगलमुर्ती कॉलनी येथील आर सी सी गटर करणे. | १५८०००० |
| ३३ | सांगली वॉर्ड क्रं.११ न्यु हडको कॉलनी येथे जाधव घर ते गजराज बंगालापर्यत आर सी सी गटर करणे. | ७९८३०० |
| ३४ | सांगली वॉ. क्रं.११ अयोध्यानगर हडको कॉलनी अतंर्गत आर सी सी गटर करणे. | ८५४१०० |
| ३५ | सांगली वॉर्ड क्रं.११ मंगलमुर्ती कॉलनी येथील दिपलक्ष्मी बंगला ते न्यु म्हाडा येथील आर सी सी गटर करणे. | १४१३६०० |
| ३६ | सांगली वॉर्ड क्रं.११ मंगलमुर्ती कॉलनी येथील सिध्दु यमगर घर ते माळी घरापर्यत आर सी सी गटर करणे. | १२६७७०० |
| ३७ | सांगली वॉर्ड क्रं.१४ हरिपूर रोड ते भोभे गटरपर्यत आर सी सी गटर करणे . | २८६१३०० |
| ३८ | सांगली वॉर्ड १४ हरिपूर रोड पाटणे प्लॉट येथील ते भोभे गटरपर्यत आर सी सी गटर करणे . | ३०००००० |
| ३९ | सांगली वॉर्ड क्र.१५ शास्त्रीनगर येथील पालकर हॉस्पीटल शेजारील मनपा ओपन स्पेस विकसीत करणे | १०४५३८९ |
| ४० | सांगली वॉर्ड क्र.१९ मधील उत्कर्ष बंगला ते गुंडा रेडडी घरापर्यतचा रस्ता एम पी एम सिलकोट करणे | १८२५१०० |
| ४१ | सांगली वॉर्ड क्र.१९ मधील बाळू कांबळे घर ते गोल्डण एग्ज शॉप पर्यत हॉटमिक्स डांबरीकरण करणे | १६६२१०० |

| | | |
|---|---|---|
| ४२ | सांगली वॉर्ड क्र.१९ मधील अनिल ढेरे घर ते माऊली बंगल्या पर्यंत आर सी सी गटर करणे. | २२००००० |
| ४३ | सांगली वॉर्ड क्र.१९ जाधव घर ते सावंत घर रस्त्यास पी सी सी गटर करणे. | २९६६०० |
| ४४ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ शाहू कॉलनी अंतर्गत आर सी सी गटर आणि पी सी सी गटर करणे . | २३६२०८६ |
| ४५ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ त्रिमुर्ती कॉलनी क्र.१,२,३ दोन्ही बाजूस पी सी सी गटर करणे | १८८९९०० |
| ४६ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ इंदिरानगर खोत हॉस्पीटल मागील बाजूस पी सी सी गटर करणे | ५३१००० |
| ४७ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ चव्हाण घर ते विनायक नगर पर्यंत आर सी सी गटर करणे | २७४०००० |
| ४८ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ स्वामी समर्थ मंदिर ते शाहू कॉलनी पर्यंत आर सी सी गटर करणे | २९९९००० |
| ४९ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ पोळ मळा अंतर्गत हॉटमिक्स डांबरीकरण करणे | १७२०००० |
| ५० | सांगली वॉर्ड क्र.१८ अ पोळ मळा विठठल नगर रोड ते तक्षशिला रोड पर्यंत हॉटमिक्स डांबरीकरण करणे | १७००००० |
| ५१ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ पोळ मळा डॉ. भोजगे घर ते प्रभाई बंगला पर्यंत हॉटमिकस डांबरीकरण करणे | ६१०००० |
| ५२ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ मुसळे प्लॉट डि मार्ट मागे दांडेकर मार्ग ते माळी घर पर्यंत हॉटमिक्स डांबरीकरण करणे | ५४५००० |
| ५३ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ डि एम पवार घर ते डि के ऑटो पर्यंत टी टाईप रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | ५८०००० |
| ५४ | सांगली वॉर्ड क्र.१८ अ मधील शामरावनगर सिध्दीविनायक चौक येथील मिरजकर घर ते बर्गे घर रस्ता खडिकरण व एम.पी.एम सीलकोट करणे | ५९२९०० |
| ५५ | मिरज वॉर्ड क्र.२० बोध्द वसाहत व आण्णाभाऊ साठे परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | २९००००० |
| ५६ | मिरज वॉर्ड क्र.२० पंढरपुर चाळ मागासवर्गीय वस्ती सुधारणा करणे | २९००००० |
| ५७ | मिरज वॉर्ड क्र.२० सावित्रीबाई फुले वसाहत अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | १२००००० |
| ५८ | मिरज येथील वॉर्ड क्र.४ येथील महादेव कॉलनी येथील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | २२५५६०० |
| ५९ | मिरज वॉर्ड क्र.६ ठोर गल्ली दबडे घ्र ते श्री क्रिष्ण् कृपा गणेश मंदिर सोनवने बोळ ते पाटील क्लिनीक रस्ते करणे | १५८९७०० |
| ६० | मिरज वॉर्ड क्र.६ अशोक पाटील ते कैकया भवन ते तानाजी शिंदे ते पोळ गल्ली रस्ते करणे | ८५२६०० |
| ६१ | कुपवाड वॉर्ड क्र.८ मधील शामनगर श्रीराम कॉलनी गुरव घर ते नाला पी सी सी व फुल राउंड गटर करणे | १४५८४०० |
| ६२ | कुपवाड वॉर्ड क्र.९ मधील धोतरे आबा झोपडप्टी परीसरातील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १७४६००० |

| | | |
|---|---|---|
| ६३ | कुपवाड वॉ.क्रं. ९ अभिनंदन कॉलनी अशोक डांगे ते विकी कांबळे घर हॉटमिक्स रोड करणे. | ११२८२०० |
| ६४ | सांगली वॉर्ड क्र.१० मधील बालहनुमान झोपडपट्टी पुर्नवसन बिल्डिंग येथे पेव्हिंग ब्लॉक व कॉंक्रिट करणे. | १२९३८०० |
| ६५ | कुपवाड वॉर्ड क्र.११ संजयनगर पाटणे प्लॉट येथे अंतर्गत पी सी सी गटर करणे | १५०९३०० |
| ६६ | सांगली वॉर्ड क्र.१३ येथील आण्णाभाऊ साठे समाज मंदिर ते मनपा शाळा क्र.१६ पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे | २३४८७०० |
| ६७ | सांगली वॉर्ड क्र.१५ कुदळे प्लॉट येथील वाघमारे घरासमोरील पी सी सी गटर करणे | ९६०००० |
| ६८ | सांगली वॉर्ड क्र.१६ मद्रासी कॉलनी व शांतीनगर परीसरातील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे | १५००००० |
| ६९ | सांगली वॉर्ड नं.१६ शांतीनगर आवळे घर ते मगदूम घ्र पर्यंत रोड कॉंक्रीटीकरण करणे | ६६४६०० |
| ७० | सांगली वॉर्ड क्र.१७ आप्पा कासार प्लॉट समोरील रस्ते हॉटमिक्स करणे | १३९९३०० |
| ७१ | सांगली वॉर्ड क्र.१७ मधील अंबाजीमाळी प्लॉट परीसरातील रस्ते करणे | १२९३८०० |
| ७२ | वॉर्ड क्र.९ सिद्धेश्वर सोसायटी धोतरे घर ते मागारे घर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | ११२८२०० |
| | **एकूण र.रु.** | **१२०११४७००** |

तसेच, महापालिकेच्या समाजकल्याण समितीकडील सन २०१९-२० लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती व दलितेत्तर सुधार योजना मधील मंजूर कामांच्या निविदा मागविणेत येवून, त्या मधून स्पर्धात्मक दरामुळे सेव्हींग झालेल्या रक्कमेमधून महानगरपालिका क्षेत्रातील खालील एकूण ७ कामांचा एकूण र.रु.८९,१८,७७७/- इतक्या प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकी रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.९ शिंगाडे घर ते पाटोळे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १०९०६०० |
| २ | मिरज वॉर्ड क्र.४ वानवासवाडी अंतर्गत रस्ते करणे. | १११६५०० |
| ३ | सांगली वॉर्ड क्र.७ शेतकरी चौक ते कर्णाळे पेंटर घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ८९५००० |
| ४ | कुपवाड वॉर्ड क्र.११ केंगार घर ते माने घर आर सी सी गटर करणे | १३०८९०० |
| ५ | कुपवाड वॉर्ड नं.१९ मधील ढेरे मळा चव्हाण घर ते विनय जांभळे रस्ता करणे. | १०६९७७७ |
| ६ | कुपवाड वॉर्ड क्र.२ सिध्दार्थ नगर येथील सि.स.नं.३३४६ मध्ये बौध्द समाज सामाजिक सभागृह इमारत बांधणे | २२४०००० |
| ७ | सांगली वॉर्ड क्र.१८ आप्पासो पाटील नगर के.आर.एस.बेकरी ते पाटील घरापर्यंत आर.सी सी गटर करणे | ११९८००० |
| | **एकुण रक्कम रुपये** | **८९१८७७७** |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, सन २०२०-२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली कामे सदर योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दि.०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.२ अभियानांतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केली असून, सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणेकरीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवलेली आहे.

| अ. क्र. | सुधार कार्यक्रम | सद्यस्थिती | पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब करणे | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| २. | महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| ३. | मालमत्ता कर विषयक सुधारणा | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| ४ | उचित उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| ५ | गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे. | तरतुद करणेत आली आहे. | --- |

सदर नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत महानगरपालिकेस प्रकल्प किंमतीच्या ७०% शासन अनुदान व ३०% महानगरपालिका हिस्सा असे अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे प्रकल्प राबविणेकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) महानगरपालिका हिस्सा यासाठी आवश्यकतेप्रमाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] श्री. संतोष पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

अनुमोदक :- N.G. Naik.
नसिमा नाईक

[signature]
शहर अभियंता

[signature]
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ९२

विषय क्रमांक :- १२

सोबतचे प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.११/०१/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

भारत सरकार अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांच्या वतीने प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत महानगरपालिकेतील अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रातील खालील तीन कामांचा एकूण र.रु.११,५२,१६,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग,मुंबई यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मान्यतेस्तव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| १. | सांगली येथील गारपीर दर्गा समोरील महानगरपालिकेची जुनी शाळा क्र.२० स.नं.४४२/२ पैकी, ४४२/९/८, ४४२/९/९ येथील उर्दु शाळा व ई-लायब्ररीची इमारत बांधणे व परिसर विकसीत करणे | २,७६,००,०००/- |
| २. | सांगली स.नं.२६१/३ ब मनपा मालकीच्या जागेवर सद्भावना मंडप बांधणे | १,४६,००,०००/- |
| ३. | सांगली स.नं.२६१/२ ब येथे मनपा ओपनस्पेस मध्ये उर्दु शाळा व व्यायाम शाळा बांधणे आणि क्रिडांगण विकसीत करणे | ७,३०,१६,०००/- |
| | **एकूण र.रु.** | **११,५२,१६,०००/-** |

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील व श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

भारत सरकार अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांच्या वतीने प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत महानगरपालिकेतील अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रातील खालील आठ कामांचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग,मुंबई यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामांची नावे |
|---|---|
| १. | मिरज स.नं.९५४६ या जागेवर मिरज दवाखाना बांधणे |
| २. | मिरज स.नं.२५९७ या मनपाच्या जागेवर मिरज तंतुवाद्य केंद्र (क्षेत्र ७०० चौ.मी.) बांधणे |
| ३. | सांगली सं.न. ४४२ या मनपाच्या जागेवर सद्भभावना मंडप बांधणे |
| ४. | कुपवाड स.नं.२००/२ब या मनपाच्या जागेमधील ३० गुंठे जागेत सद्भावना मंडप बांधणे |
| ५. | मिरज स.नं.१३३/१३४ब/६/७/२०१ ब मधील मनपाच्या जागेमध्ये सद्भावना मंडप बांधणे |
| ६. | सांगली स.नं.२९५/२अ या मनपाच्या जागेवर सद्भभावना मंडप बांधणे |
| ७. | सांगली ताराई पार्क स.नं.५००६/ब/९६ या मनपाच्या जागेवर सद्भभावना मंडप बांधणे |
| ८. | मिरज मनपा उर्दु शाळा नं.१७ इमारत बांधणे |

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

महापौर.

नगरसचिव
महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ८३

विषय क्रमांक :- १३

---

सोबतचे प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.१४/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२० महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत मंजूर र.रु.१२.१८ कोटी रक्कमेतून शिल्लक राहिलेल्या रकमेतून तयार केलेला तीन कामांचा र.रु.५६ लक्ष रक्कमेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस प्रस्तावित करणेत आलेले आहे. तथापि, प्रस्तावामधील अ.क्र.१ चे काम महापालिका निधीतून प्रस्तावित असलेने सदरचे काम रद्द करुन, त्याऐवजी खालील प्रमाणे अ.क्र.१ व २ या कामाचा समावेश करुन मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| १. | मिरज वॉर्ड क्र.४ आळतेकर बोळ रस्ता कॉंक्रिट करणे. | ८,२१,२००/- |
| २. | मिरज वॉर्ड क्र.४ रुगंठा उद्यान ते सावंत मंडप व जनप्रवास कार्यालय ते भोसले घर टी टाईप रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे | १४,७८,८००/- |
| ३. | मिरज वॉर्ड क्र.४ कलावतीनगर मालगाव रोड शहरी आरोग्य केंद्र क्र.९ जवळील रस्ता डांबरीकरण करणे. | २४,५०,०००/- |
| ४. | मिरज वॉर्ड क्र.४ निगवेकर बोळ पोरे बोळे,भिसे बोळ,घाडगे बोळ रस्ता सुधारणा करणे. | ८,५०,०००/- |
| | **एकूण र.रु.** | **५६,००,०००/-** |

सूचक :- श्री: पांडुरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री: विनायक सिंहासने.

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ८४

विषय क्रमांक :- १४

सोबतचे प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.३१/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेमधून सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील काळीखण व परिसर सुशोभिकरणाचा र.रु.१,२८,३३,९१४/- मात्रचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मनगू केरु सरगर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९ मधील अभयनगर येथील सि.स.नं.५५६४ क्षेत्र २९६२.५चौ.मी. महापालिका जागेत महिला विकास भवन र.रु.३.५कोटी इतक्या रक्कमेच्या कामाचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून करणेस प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे. महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ८५

विषय क्रमांक :- १५

सोबतचे प्र.शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील श्रीकृष्णा नदी वरील आर्यविन पुल रामेश्वर मंदिर ते को.प.पर्यत प्रस्तावित पुर संरक्षक बांधकाम करणेसाठी महापालिकेच्या वतीने शासन निर्णयातील परिशिष्ठ २ च्या निर्णयान्वये समंत्तीपत्र देणे तसेच, प्रस्तावित कामासाठी मान्यता अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या दि.३०/०८/२०१९ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार सहभागीता रक्कम जलसंपदा विभागाकडे वर्ग करणे व सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा दोषदायीत्व कालावधीत संपल्यानंतर सदरचे काम महापालिकेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर पुढील देखभाल दुरुस्तीची जबाबदारी महापालिकेकडे येणार असल्याने याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर झाले चर्चेनुसार सदर प्रस्तावास ही सभा मान्यता देत अाहे.

तसेच, पावसाळ्यामध्ये व पुरपरिस्थिती वेळी व अतिवृष्टीवेळी महापालिका क्षेत्रातील नागरी भागातील पावसाळी पाण्याचा व सांडपाण्याचा निचरा योग्यरित्या होणेसाठी महापालिका क्षेत्रातील नागरी भागातील नैसर्गिक नाले बांधकामासाठी निधी मंजुरीसाठी आराखडे व अंदाजपत्रके तयार करुन, निधी मागणी करणेस प्रस्ताव सादर करणेस ही सभा आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडूरंग कोरे.

महापौर,

शहर अभियंता

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ८६

विषय क्रमांक :- ऐन.

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१९/०१/२०२१ रोजीचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२०-२१ या अभियानामध्ये सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका अमृत शहर असून, स्वच्छ सर्वेक्षण २०२०-२१ ही एकूण ६०० गुणांकन असलेली स्पर्धा आहे. यामध्ये कचरा मुक्त शहर ३ स्टार रेटींग प्राप्त झालेस, त्यास ६०० गुण देणेत आलेले आहेत. सदर स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविणे अनिर्वाह असलेने, सदर स्पर्धेत ३ स्टार मानंकन प्राप्त करणेसाठी सदर स्पर्धेमध्ये भाग घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रामध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०२०-२१ अंतर्गत पर्यावरण संतुलनासाठी पंचतारांकित (५स्टार) घरे अभियानांतर्गत पंचतारांकीत घरांचा दर्जा प्राप्त करणाऱ्या घरांना घरपट्टीमध्ये सामान्य करात सुट देणेबाबत प्राप्त प्रस्तावास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० ब अन्वये मालमत्ता धारकांने (१) सौरऊर्जेचा वापर करणे (२) गांडूळ खत प्रकल्प राबविणे (३) रेनवॉटर हार्वेस्टींग करणे (४) होम कंपोस्टींग करणे (५) सांडपाण्याचा निचरा करणे या पाच बाबींपैकी तीन बाबींची पुर्तता केल्यास त्या मिळकतीस सामान्य करात ४% सवलत देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] श्री. पांडुरंग कोरे

[signature] महापौर,

वैद्यकीय आरोग्य अधिकारी

[signature]

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ८७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१९/०१/२०२१ रोजीचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका मालकीची मिरज येथील सि.स.नं.४८१०/१ क्षेत्र ६२५.१६ चौ.मी.फुट जागा खरेदीने ई-लिलावाने देणेस मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने ई-लिलाव प्रसिद्ध करणेत आला होता. सदर लिलाव प्रक्रियेमधील पात्र पाच पैकी भाग घेतलेल्या तीन लिलावधारकांपैकी श्री.तोफिक महिबूब बागवान यांची र.रु.२,८७,६२९/- इतकी उच्चतम बोली असून, श्री.बागवान यांचेकडून लिलाव बोलीची रक्कम प्रथम भरुन घेणे, स्टॅम्प ड्युटी व खरेदी पत्राचा खर्च लिलाव बोली धारकांने करणे, यासह सदर लिलावातील शर्ती-अटीस अधिन राहून श्री.तोफिक महिबूब बागवान यांच्या नावाने कायमखुष खरेदीपत्र करुन देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडूरंग कोरे. महापौर.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ८८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.रईसा मुस्ताकअली रंगरेज यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१ मधील अहिल्यानगर बाजारपेठ येथे रस्त्यावर आठवडा बाजार भरत आहे.सदर बाजाराच्या ठिकाणी तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. त्यामुळे संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी बंद होतो. सद्यस्थितीत कोव्हिड १९ या साथीच्या रोगाचा प्रार्दुभाव होत आहे. गर्दीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते, सदरचा भाजीपाला व्यवसाय व्यापाऱ्यांना त्यालागून असणाऱ्या शेडगे किराणा स्टोअर्स समोर ८० फुटी प्रशस्त रस्ता आहे. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मुबलक जागा आहे. त्यामुळे लोकांची गर्दी कमी होणार व वाहतुकीस अडथळा होणार नाही. नागरिकांची चांगली सोय होईल त्या भागातील नागरिकांची तेथे भाजीपाला विक्रीचा बाजार शेडगे किराणा स्टोअर्स समोर ८० फुटी रस्त्यावर करावा अशी वारंवार मागणी होत आहे. तरी सदर भाजीपाला बाजार अहिल्यानगर बाजारपेठ येथून तेथे जवळ असणाऱ्या शेंडगे किराण स्टोअर्स समोर ८० फुटी रस्त्यावर भरविणेकामी प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी विचारार्थ व निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर झाले चर्चेअंती सदरचा प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- (सही) श्री. विनायक सिंहासने

अनुमोदक :- (सही) श्री. पांडुरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

(सही)
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ८६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये लाभार्थ्यांनी अनुदान योजनेतून वैयक्तीक शौचालय बांधलेली आहेत. यामध्ये पात्र लाभार्थ्यांनी शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. त्यामधील काही पात्र लाभार्थ्यांना बांधकाम पूर्ण करुन देखील शौचालयाचे फोटो मा.शासनाच्या पोर्टलवर अपलोड न केल्याने महानगरपालिकेकडून शौचालयाचे अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही. याबाबत आम्ही वैयक्तीक स्वरुपात शौचालयाचे अनुदानाबाबत पाठपुरावा केलेला आहे. परंतु, संबंधीतांकडून मुदतीत कार्यवाही न केल्याने बरेचशे लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार आहेत. सबब, ज्या लाभार्थ्यांनी वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेले आहेत. त्यांना अनुदानाचा पहिला व दुसरा हप्ता देणेकामी आर्थिक तरतुद करावी. त्यासाठी महानगरपालिकेने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सदरची अनुदान योजना पुन:श्च कार्यान्वीत करणेसाठी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर झाले चर्चेनुसार सदर प्रस्तावाबाबतचा सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ९०

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरा घरकुल मिरज दिंडीवेस,मालगाव वेस येथील वारस व वाढीव पात्र लाभार्थी तसेच, संजय गांधी नगर मिरज येथील वंचित व वाढीव पात्र लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्याकरीता महापालिकेचे एकात्मिक आवास योजनेंतर्गत एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुल मिळण्याकरीता अर्ज केलेले आहेत. तसेच, संबंधीत लाभार्थी यांनी घरकुलासाठी लागणारे आवश्यकती सर्व कागदपत्रे नगर अभियंता,शं.ना.द.नि.या कक्षाकडे सादर केलेली आहेत. त्यास अनुसरुन मालती सचिन बनसोडे, श्री.दादासाहेब हिंदूराव कांबळे, कस्तुरी आप्पासाहेब घटकांबळे,अनुराधा हणमंत कांबळे,सुमन पायाण्णा कोळी, सुभद्राबाई पांडूरंग कुरणे, श्रीकांत हिराप्पा कांबळे, श्री.अमोल विकास सुर्यागण सदर लाभार्थ्यांना एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ देणेबाबतच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार उक्त लाभार्थ्यांना मा.शासनाच्या निकषानुसार पुरावे व कागदपत्रांची पडताळणी करुन घेवून मा.शासन निकषानुसार पात्र ठरणारे लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उपरोक्त प्रमाणे १.अतिक अहमद सुतार , २. शहनाझ नासिर शेख, ३. बेबी मोहसीन बेग, ४. परवेझ अहमदअब्दुलगणी सुतार ५.अमजद बादशा उगारे या झोपडपट्टी धारकांना संजयगांधी नगर या घरकुल योजनेमध्ये मा.शासनाच्या निकषानुसार पुरावे व कागदपत्रांची पडताळणी करुन घेवून मा.शासन निकषानुसार पात्र ठरणारे लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.वहिदा नायकवडी.

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ९१

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विवेक आप्पा कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरा घरकुल मिरज दिंडीवेस,मालगाव वेस येथील वारस व वाढीव पात्र लाभार्थी तसेच, संजय गांधी नगर मिरज येथील वंचित व वाढीव पात्र लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्याकरीता महापालिकेचे एकात्मिक आवास योजनेंतर्गत एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुल मिळण्याकरीता अर्ज केलेले आहेत. तसेच, संबंधीत लाभार्थी यांनी घरकुलासाठी लागणारे आवश्यकती सर्व कागदपत्रे नगर अभियंता, शं.ना.द.नि.या कक्षाकडे सादर केलेली आहेत. त्यास अनुसरुन संगिता मारुती संकपाळ,कांचन पांडूरंग देवकुळे या सदर लाभार्थ्यांना एकात्मिक आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ देणेबाबतच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार उक्त लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणेबाबत मा.शासनाच्या निकषानुसार पुरावे व कागदपत्रांची पडताळणी करुन घेवून मा.शासन निकषानुसार पात्र ठरणारे लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे.

महापौर,

नगरअभियंता
शं.ना.द.नि.व

महानालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ९२

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.७ मधील उदगाव वेस मरगुबाई मंदिर जवळील शंकर सायकल लगत असलेली मुतारी पाडणे आवश्यक आहे. सदरची मुतारी ही अत्यंत जुनी झालेली असून, धोकादायक झालेली आहे. त्यामुळे त्याचा वापर होत नाही. तसेच, सदर ठिकाणी मंदिर असल्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना व सदर ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीमुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदरची मुतारी पाडणेबाबत परिसरातील नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. तरी, वॉर्ड क्र.७ मधील उदगाव वेस मरगुबाई मंदिर जवळील शंकर सायकल लगत असलेली मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (सही) सौ. अप्सरा वायदंडे — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- N. G. Naik. सौ. नसीमा नाईक. — (सही) महापौर,

सहा.आयुक्त (मिरज)

(सही)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ९३

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.आनंदा मारुती देवमाने_यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये सद्या शहर अभियंता हे पद रिक्त असून, या पदावर सद्या महापालिकेचे नगरअभियंता श्री.परमेश्वर हलकुडे यांचेकडे प्रभारी कार्यभार सोपविणेत आलेला आहे. श्री.हलकुडे हे महानगरपालिकेचे अनुभवी अधिकारी आहेत. तसेच, त्यांनी यापूर्वी लातुर येथील किल्लारी येथे झालेल्या भूकंपामध्ये चांगले काम केलेले आहे. त्यामुळे शासनानेच त्यांना सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये अभियंता या पदावर नियुक्ती केलेले आहे. तरी, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदावर मा.शासना कडील प्रतिनियुक्ती वरील शहर अभियंता न पाठविता श्री.हलकुडे यांनाच महापालिकेच्या शहर अभियंता पदावर नियुक्ती देणेकामी ही सभा मा.शासनाकडे शिफारस करीत असून, याबाबत प्रशासनाने मा.शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे.

महापौर,

प्रशा.उप.चि. (अध्यक्ष)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिक

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ९४

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली येथील माधवनगर रोडवरील माळबंगला जलशुद्धीकरण केंद्राची जागा तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या सन १९८४ पासून मालकीची असताना तसेच सिटी सर्व्हेच्या दप्तरी त्याची रितसर नोंद असताना महानगरपालिकेची तसेच सभागृहाची दिशाभूल करुन खोट्या व बनावट ७/१२ च्या उताऱ्यानुसार महापालिकेच्या मालकीचीच जागा सुमारे ७ कोटी रुपयांना विकणेचा उद्योग सन २०१३ मध्ये झाला असून, सदर जागेच्या खरेदीसाठी महापालिकेने सदर रक्कम धनादेशाद्वारे अदा करुन रितसर जिल्हा निबंधकांसमोर खरेदीपत्र केलेले आहे. परंतु सदरचा व्यवहार हा खोट्या व बनावट ७/१२ चे आधारे केलेला असलेने व सदरची जागा यापूर्वी पासून म्हणजेच १९८४ पासून तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या मालकीची असलेने सन २०१३ पासून आज अखेर खरेदी केलेल्या २ हेक्टर ९१ आर इतक्या जागेवर नाव लागलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. सदर जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेवर सन १९७६ पासून जलशुद्धीकरण केंद्राचे आरक्षण असून ते आज अखेर कायम आहे. एकूण क्षेत्र ३ हेक्टर ८५ आर इतके आहे. या संपूर्ण क्षेत्राची नोंद सिटी सर्व्हे कार्यालयात सन १९८४ पासून असून, त्याची मालकी तत्कालीन सांगली नगरपरिषदेची आहे. यापूर्वी सन २००८ मध्ये याच मालकाने एकणू क्षेत्रापैकी ९४ आर इतकी जागा विकसनकर्ते शेखर माने व गंगवाणी यांना रक्कम रुपये दोन लक्ष मात्रला विकसीत करणेसाठी दिलेली आहे. या विकसनकर्त्यांनी तेथे इमारती बांधून कोट्यावधी रुपयांना त्या विकल्या असून, कोट्यावधी रुपये कामावलेचे दिसून येते. वरील दोन्ही व्यवहार हे बेकायदेशीर व महापालिकेची फसवणूक करणारे आहेत या करीता महासभेमध्ये सखोल चर्चा होवून, महासभा ठराव क्र.६५ दि.०६/१०/२०१७ तहकूब दि.०९/१०/२०१७ अन्वये एकमताने मंजूर करुन महापालिकेची फसवणूक करणाऱ्यांवर फौजदारी दाखल करणेचे आदेश पिठासीन अधिकारी यांनी दिलेले होते. परंतु, आजअखेर सदर ठरावाची अंमलबजावणी करणेस प्रशासन जाणीवपुर्वक टाळाटाळ करीत असलेचे दिसून येते आहे. त्याकरीता महानगरपालिकेच्या मालकीची जागा महापालिकेला विकणाऱ्यांवर तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा महानगरपालिकेच्या पुर्व मान्यतेशिवाय विकसीत करुन कोट्यावधी रुपये लुटणाऱ्या विकसनकर्ते शेखर माने व गंगवाणी यांचेवर सुद्धा फौजदारी दाखल होणे गरजेचे आहे. तसेच, या फसवणूक करणाऱ्यांवर फौजदारी दाखल करणे बाबत सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे. महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ९५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तत्कालीन नगरपालिकेमध्ये अस्थापनेवर वैद्यकिय क्षेत्रातील मानद त्वचा रोगतज्ञ म्हणून श्री.डॉ.अरविंद पांडूरंग कुलकर्णी यांनी तत्कालीन नगर पालिकेकडील दवाखाना क्रमांक ७ कडे विना मोबदला त्वचा रोगाची सेवा या परिसरातील नागरिकांना दिलेली आहे. तरी त्यांच्या कामास पोच पावती म्हणून श्री.अरविंद पांडूरंग कुलकर्णी यांना सेवासन्मान पुरस्कार देणेस ही सभा मान्यता देतआहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना प्रार्दुभाव काळामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील प्रामाणिक व सदभावाने रुग्ण सेवा केलेले व सद्या करीत असलेले डॉ.बिंदूसार पलंगे यांनी कोरोना काळामध्ये अनेक रुग्णांचेवर उपचार करुन आरोग्य क्षेत्रामध्ये महत्वाची भुमिका बजावलेली असून, विविध प्रसार माध्यमातून कोरोना या विषयावर जनतेचे प्रबोधन केले असलेने, डॉ.बिंदूसार पलंगे यांना तसेच, महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना प्रार्दुभाव काळामध्ये सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता सेवा बजावलेली आहे. कोरोना काळात अनेक ठिकाणी सफाई कर्मचाऱ्यांनी स्वच्छता करुन औषध फवारणी व कोरोना रुग्णांची मानवतेच्या दृष्टीकोनातून सेवा केलेली आहे. या काळामध्ये ज्या सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झालेली होती अशा कर्मचाऱ्यांना महापालिकेकडून सेवा सन्मान पुरस्कार देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ₹६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.गणेश माळी,श्री.पांडूरंग कोरे,सौ.गायत्री कुल्लोळी, श्री.राजेंद्र कुंभार, श्री.विनायक सिंहासने,श्री.संजय मेंढे,सौ.बबिता मेंढे,सौ.संगिता हारगे,श्री.संतोष पाटील,सौ.पवित्रा केरीपाळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथे भव्य असे मिरज जक्शन असून, दररोज लाखोंच्या संख्येने प्रवाशांचा मिरज रेल्वे स्टेशन संपर्क येत असतो. मिरज येथील रेल्वे जंक्शनला महात्मा बसवेश्वर महाराजांचे नावे देणेसाठी मिरज परिसरातील नागरिकांची व समस्त लिंगायत समाजाकडून होत आहे. महात्मा बसवेश्वर महाराज हे लोकशाहीचे आद्य संकल्पक होत. जगातील पहिला लोकशाही संसद म्हणजे अनुभव मंटप ची स्थापना त्यांनी बाराव्या शतकामध्ये आपल्या देशात केली आहे. संपूर्ण भारतवासीयांना अभिमान वाटावा असा त्यांचा गौरवाचा इतिहास आहे. बाराव्या शतकामध्ये त्यांनी प्रधानमंत्री म्हणून कार्य करीत असताना आदर्श राज्य कारभार करुन दाखवला. भारत देशातील वेगवेगळ्या भागातील जनता अनुभव मंटपास भेट देवून त्यांनी कार्यपद्धती अनुभवलेची अनेक उदाहरणे आजही सर्वांना मार्गदर्शक ठरत आहेत. मिरज येथील रेल्वे जंक्शनला महात्मा बसवेश्वर महाराजांचे नाव देणेसाठी मिरज परिसरातील नागरिकांची व समस्त लिंगायत समाजाकडून होत असलेली मागणी आणि महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या कार्याचा यथोचित सन्मा व्हावा यासाठी मिरज येथील रेल्वे जंक्शनला जगद्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर महाराज जंक्शन असे नामकरण करणेस व तसा प्रस्ताव केंद्र शासन व भारतीय रेल्वे प्रशासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता देणेसाठी सदर प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार जगद्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर महाराज जंक्शन, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जंक्शन, हजरत खॉजा शमनामिरा साहेब जंक्शन ही तीन नावे भारतीय रेल्वे प्रशासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेत यावा व रेल्वे प्रशासनाकडून यापैकी ज्या नावास मान्यता देणेत येईल ते नाव मिरज जंक्शनला देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.पांडूरंग कोरे.

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका आणि तत्कालीन नगरपरिषदेपासून जे बदली सफाई कामगार सद्या वयाची ६० वर्षे पुर्ण झालेली आहेत म्हणून सेवेतून त्यांना कमी करण्यात आलेले आहेत आणि जे बदली सफाई कर्मचारी व रोजंदारी वरील कर्मचारी मयत झालेले आहेत त्या सर्वांच्या वारसांना बदली कामगार म्हणून सेवेत घेणे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील पंप हाऊस विभागातील बदली कामगार गेली २५ ते ३० वर्षापेक्षा जास्त काळ पंप आपरेटर मदतनीस,प्रभारी पंप ऑपरेटर इलेक्ट्रीकल मेन्टनन्स् ,प्रभारी लॅब असिस्टंट, प्रभारी फीटर ऑपरेटर,प्रभारी मीटर रीडर,प्रभारी फीटर, मिटर रीडर मदतनीस या सर्व बदली कामगारांची सद्या काम असलेल्या पदांची प्रभारी नियुक्ती ऑर्डर देणेत यावी व त्यांना कुशल प्रवर्गामध्ये घेवून कुशल कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी लागू करणे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली आणि कुपवाडच्या पाणी पुरवठा विभागाकडे जे कर्मचारी मानधनावर मजूर म्हणून नियुक्ती केलेले कर्मचारी हे बरीच वर्षे फिटर,व्हॉलमन,चावीवाला अशा तांत्रिक पदांवर कर्तव्य बजावत आहेत. त्या सर्वांची मजूर ही मानधनावरची ऑर्डर बदलून ते सद्या ज्या पदावर काम करत आहेत त्या पदांची मानधनावरील नियुक्तीचे आदेश देवून त्यांना कुशल कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी लागू करणे.

उपरोक्त प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

प्र.ना.अधिक्षक (आस्थापना)

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

महानगरपालिका सचिव,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०१/२०२१

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.शिवाजी बाबुराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील लहान मोठे शासकीय व खाजगी दवाखाने,हॉस्पिटल, विविध चाचण्या करणाऱ्या लॅब इ.मधून दैनंदिन निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी महानगरपालिका क्षेत्रातील मिरज बेडग रोड येथील मनपाच्या खुल्या जागेमध्ये कॉमन इन्सिनेटर प्रकल्प उभारणेचा निर्णय घेणेत आला होता. त्यानुसार महापालिकेने या प्रकल्पाचे काम इंडियन मेडिकल असो.मिरज यांना १० वर्ष मुदतीने मिळालेले आहे. ठेका मिळाले नंतर साधारण १ वर्ष काम सुरु राहिले परंतु, त्यानंतर सदरचा प्रकल्प बंद अवस्थेत दिसून येत आहे. सदर ठिकाणी बसविणेत आलेली यंत्रसामुग्री बंद अवस्थेत आहे. सदर मक्तेदाराने महानगरपालिकेस रॉयल्टी भरलेली नाही. तसेच, सदर मक्तेदाराने प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मान्यता घेतलेचे दिसून येत नाही. प्रकल्पाचे ठिकाणी कोणत्याही प्रकारची डागडूजी व खबरदारीचे उपाय केलेले नाहीत. प्रकल्प इमारतीचे / शेडची अत्यंत दुरावस्था झालेली आहे व ते केंव्हाही मोडकळीस येवून एखादी दुर्घटना होणेची शक्यता नाकारता येत नाही. यावरुन सदरचे मक्तेदार हे काम करणेस सक्षम नाहीत असे दिसून येत आहे व यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे व जैवीक कचरा उठाव न झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ही निर्माण झालेला आहे. दि.२५/०४/२०१७ रोजी MPCB च्या पत्राने दुरुस्त्या प्रकल्पामध्ये करण्याबाबत कळविले होते. सदरील दुरुस्त्या करुपर्यत सदर प्रकल्प बंद ठेवलेबाबत MPCB ने कळविले होते. तद् नंतर दि.१६/०६/२०१७ रोजी सदरील त्रुटी पुर्ण करणेसाठी IMA ने तीन महिने मुदत मागितली होती. मात्र आजपर्यत सदर प्रकल्पातील त्रुटी पूर्ण करुन MPCB कडून NOC आणण्यास IMA अपयशी ठरलेली आहे. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या हॉस्पिटलसाठी लागणारे प्रमाणपत्र देत असताना IMA ने ज्यादा फी डॉक्टरांकडून आकारल्या बाबत दि.२४/०७/२०१७ रोजी जत व परिसरातील डॉक्टरांनी लेखी स्वरुपात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार केलेली आहे या बाबी महापालिकेशी झालेल्या शर्ती-अटी भंग करणाऱ्या आहेत. तसेच दि१८/०८/२०१७ रोजी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पास भेट दिली असता, बेकायदेशिररित्या IMA कडून सदर प्रकल्प अजूनही सुरु ठेवलेला आहे हे दृष्टीपथात आलेनंतर त्यांना त्याबाबत लेखी नोटीसही देणेत आलेली आहे.

... २ ...

महानगरपालिका व MPCB ने प्रकल्प बंद केला असताना तो सुरु ठेवणे म्हणजे फौजदारी स्वरुपाचा गुन्हा असून ही बाब गंभीर आहे. तसेच, महानगरपालिकेची रॉयल्टी IMA कडून थकीत असलेमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच, मा.कायदे सल्लागार महानगरपालिका यांनी आपल्या अभिप्रायामध्ये ठेका रद्द करणेबाबत कार्यवाही करावी असे स्पष्ट नमुद केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, सदर मक्तेदाराचा उर्वरित ठेका रद्द करुन सदरचे काम करणेस तयार असलेल्या मक्तेदार यांना देणेसाठी चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार IMA ने दोन वर्षे सदरचा प्रकल्प बंद ठेवलेने, महापालिकेची रॉयल्टी बुडून आर्थिक नुकसान झालेले असलेने, सदरचा ठेका ही सभा रद्द करीत असून, ठेकेदाराकडे थकीत असलेली रॉयल्टी वसुल करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये इन्सीनेटर प्रकल्प चालू राहणे आवश्यक असलेने अध्यक्ष,इंडियन मेडीकल असो.पुलाची शिरोली यांनी त्यांचे दि.१८/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये मा.महापौर यांना लेखी पत्र देवून, सदरचा प्रकल्प महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार चालविणेस तयार असलेचे कळविलेले आहे. त्यानुसार सदर प्रकल्प IMA पुलाची शिरोली यांना चालविणेस देणेस ही सभा सहमती दर्शवित असून, सदर IMA पुलाची शिरोली यांचेशी करारपत्र झालेनंतर सदर प्रकल्पातील त्रुटी दूर करुन MPCB व महाराष्ट्र शासन यांचेकडून परवानगी आणणेची जबाबदारी IMA पुलाची शिरोली यांची राहील या अटीवर, IMA मिरज यांना ज्या पद्धतीने ठेका देणेत आला त्याच धर्तीवर र.रु.४० हजार प्रति महा रॉयल्टी भरणेच्या अटीवर पंधरा वर्ष मुदतीने सदरचा ठेका IMA पुलाची शिरोली यांना देणेसाठी ही सभा मान्यता देत असून, IMA पुलाची शिरोली यांना बेडग रस्तावरील महानगरपालिका कॉमन इन्शुलेटर प्रकल्प व त्यास आवश्यक जागा व सद्यस्थितीतील इमारतीचा ताबा प्रशासनाने देणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- शिवाजी दुर्वे श्री.शिवाजी दुर्वे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.शांता र.जाधव सौ.शांता जाधव. महापौर,

महापालिका सचिव

ली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.सुनंदा चंद्रकांत राऊत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात होर्डिंगचा जाहिरात कराचा दर पुर्वी प्रति चौ.फुट १/- रुपया इतका होता. नंतर तो दर वाढ करुन प्रथमतः प्रति चौ.फुट रु.१२/- व नंतर पुन्हा हाच जाहिरात कर प्रति चौ.फुट रु.२५ इतका करणेत आला होता. मागील वर्षी महापूर व यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदर व्यवसाय पुर्णत / ठप्प झालेला आहे. सदर व्यवसाय हा मुंबई,पुणे यासारख्या मोठ्या शहरातील कंपन्यांवर अवलंबून आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर व आर्थिक मंदी याचा मोठा फटका या व्यवसायाला बसला असून, सदर व्यवसायामध्ये होर्डिंगसाठी जाहिरात मिळणे कठीण झाले आहे. परिणामी सदर व्यवसाय अडचणीत आला आहे. सदर लोक हे मनपा क्षेत्रामध्ये असून, या व्यवसायाचा विचार करता या व्यवसायावरती बऱ्याच लोकांना रोजगार उपलब्ध होत असून या व्यवसायावरील बऱ्याच लोकांचा उदरनिर्वाह या वरती अवलंबून आहे. त्यामुळे होर्डिंग व्यवसायाचा व्यवसायवृद्धीच्या अनुषंगाने विचार करता होर्डिंगचा जाहिरात कर दर सुधार समितीने व महासभेने घेतलेल्या दि.२० डिसेंबर २०१९ चा महासभा ठराव क्र.१४१ विषय क्र. ८ नुसार जाहिरात कर प्रति चौ.फुट ५०/- दराबाबतचा घेतलेल्या निर्णयाचा फेर विचार करावा.

महापूर आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर होर्डिंगचा जाहिरात कर मार्च २०२२ या वर्षा अखेर पर्यत मागील दराप्रमाणे फॉर्म फी,अनामत रक्कम, जाहिरात कर प्रति चौ.फुट २५/- व इतर कर आकारणेत यावेत व एप्रिल २०२२ पासून होर्डिंग जाहिरात कर दर प्रति चौ.फुट ३५/- इतका आकारणेत यावा यासाठी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सन २०१९ मध्ये आलेल्या महापुर तद्नंतर कोविड-१९ चा प्रार्दुभाव विचारात घेता, एप्रिल २०२० ते मार्च २०२१ पर्यत होर्डिंग जाहिरात कर दर प्रति चौ.फुट २५/- इतका आकारणेत यावा आणि सन एप्रिल २०२१ पासून होर्डिंग जाहिरात कर प्रति चौ.फुट ३५/- दर आकारणेस तसेच, एप्रिल २०२२ पासून होर्डिंग जाहिरात कर दर प्रति चौ.फुट ३७/- इतका आकारणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] सौ. अप्सरा वायदंडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] श्री. शिवाजी दुर्वे.

[signature]
महापौर,

[signature]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०१/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- १००

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ क येथील विनायकनगर संजिवनी हनुमान मंदिर परिसर येथे मनपा ओपन स्पेसमध्ये अमृत अभियान हरित क्षेत्र विकास योजनेंतर्गत उद्यान विकसीत करणेत आले असून, सदर उद्यानास लोकनेते राजारामबापू पाटील उद्यान असे नामकरण करणेची मागणी सदर भागातील नागरिकांकडून होत आहे. यासाठी सदर उद्यानास लोकनेते राजारामबापू पाटील उद्यान असे नामकरण करणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री: विष्णू माने.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री: संतोष पाटील.

महापौर,

मा.कामगार व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका